७० वर्ष

दैनिक
# संध्या
नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

गुरुवार, दि. १२ मार्च २०२६

www.dainikesandhya.com    www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०७६ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## मानहानी प्रकरणात राहुल गांधींना मोठा दिलासा

नाशिक (दै. संध्या) : स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या कथित मानहानी प्रकरणात काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांना मोठा दिलासा मिळाला आहे. नाशिक न्यायालयाने या प्रकरणातील संपूर्ण कार्यवाही अधिकृतपणे रद्द केली आहे. त्यामुळे या प्रकरणाचा अंतिम निकाल लागल्याचे स्पष्ट झाले आहे. या खटल्यातील सर्व प्रक्रिया संपुष्टात आल्याची माहिती ज्येष्ठ विधिज्ञ जयंत जायभावे यांनी दिली. न्यायालयाच्या या निर्णयामुळे दीर्घकाळ सुरू असलेल्या वादावर आता पडदा पडला आहे. या प्रकरणाची सुरुवात अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी न्यायालयाच्या आदेशापासून झाली होती. सुरुवातीला या न्यायालयाने प्रक्रियेचा आदेश काढला होता. त्या निर्णयाविरोधात राहुल गांधी यांच्या वकिलांनी नाशिक सत्र न्यायालयात फौजदारी पुनरावलोकन अर्ज दाखल केला. या अर्जावर सुनावणी घेतल्यानंतर सत्र न्यायालयाने तो अंशतः मंजूर केला आणि आधीचा प्रक्रिया काढण्याचा आदेश रद्द केला.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

## २५०० हॉटेल, ९०० उद्योगांना फटका

नाशिक (दै. संध्या) : चार दिवसांपासून व्यावसायिक गॅस सिलेंडरचा पुरवठा बंद करण्यात आला आहे. यामुळे शहरातील 900 छोटे उद्योग, 2500 हॉटेल, रेस्टॉरंटस्, स्वीट मार्ट अडचणीत आले आहेत. सिलेंडरला पर्याय म्हणून चूल, शेगड्या पेटविण्यात येत आहेत. यामुळे आता चुलीवरचे मटण, मिसळनंतर आता चुलीवरची मिठाई अनुभवण्याची वेळ नाशिककरांवर आली आहे. इराणसोबत इस्त्रायल व अमेरिकेच्या युद्धाचा दहावा दिवस उलटला असून, इंधन व घरगुती गॅस टंचाईची झळ सामान्य माणसाच्या स्वयंपाकघरापर्यंत आली आहे. घरगुती गॅस आता 25 दिवसानंतरच बुकिंग होत असून, व्यावसायिक सिलेंडरचा पुरवठा पूर्ण बंद केला आहे. याचा सर्वाधिक फटका छोटे-मोठे हॉटेल्स, रेस्टॉरंटस् आणि मिठाईच्या दुकानांना बसला आहे. अनेक जणांवर व्यवसाय बंद करण्याची वेळ आली आहे. सरकारने त्या लाखो लोकांचा विचार करावा, ज्यांची भूक हे रेस्टॉरंटस् भागवतात, अशी भावना व्यक्त होत आहे.

## महागाईच्या खाईत लोटणे हे कोणते धोरण

पुणे (दै. संध्या) : रशिया, युक्रेन आणि इराण-इस्रायलमधील युद्धाचे पडसाद उमटतायत खरंय, पण त्या आडून जनतेला महागाईच्या खाईत लोटणे हे कोणत्या धोरणात बसते? असा सवाल राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे खासदार अमोल कोल्हे यांनी उपस्थित केला आहे. सध्या सुरू असलेल्या इराण इस्राइल आणि अमेरिकेच्या युद्धामुळे भारतात अनेक राज्यांमध्ये गॅस टंचाईचा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर अमोल कोल्हे यांनी ट्विट करत भाष्य केले आहे. अमोल कोल्हे म्हणाले, माझ्या मतदारसंघातील चाकण MIDC असो वा हडपसर-भोसरीचा पट्टा. आज उद्योगांना ऊर्जेचा आणि इंधनाचा प्रचंड तुटवडा जाणवतोय. अनेक कंपन्या 50 टक्के क्षमतेने चालतायत, तर काहींनी उत्पादने थांबवली आहेत. कामगारांच्या हाताला काम नाही आणि उद्योजकांच्या डोक्यावर चिंतेचे सावट आहे! महाराष्ट्रासह संपूर्ण देशात गॅस पुरवठा खंडित होतोय, हॉटेलं बंद पडतायत, कष्टकऱ्यांचा रोजगार जातोय, आंतरराष्ट्रीय धोरणाच्या नावाखाली इंधन दरवाढ थोपवण्यात सरकार अपयशी ठरलंय.

## अभय छाजेड यांची थेट राहुल गांधींकडे तक्रार

पुणे (दै. संध्या) : महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे कोषाध्यक्ष अभय छाजेड यांच्यावर आर्थिक गैरव्यवहार, तिकीट विक्री आणि जमीन बळकावल्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या प्रकरणी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस अॅड. आमिर शेख यांनी काँग्रेस खासदार राहुल गांधी यांना पत्र पाठवून छाजेड यांना तात्काळ निलंबित करून पक्षातून हकालपट्टी करण्याची मागणी केली आहे. अॅड. शेख यांनी पत्रात नमूद केले आहे की, ते महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस आहेत. त्यांनी नऊ वर्षे नॅशनल स्टुडंट युनियन ऑफ इंडिया (एनएसयूआय) महाराष्ट्राचे प्रदेशाध्यक्ष म्हणूनही काम केले आहे.

# महाराष्ट्रात सुलभ व विश्वासार्ह व्यवस्था

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस** | **उद्योग विभागाच्यावतीने आठ कंपन्यांसोबत सामंजस्य करार**

- महाराष्ट्रात ४४,७१० कोटींची गुंतवणूक
- आठ कंपन्यांसोबत सामंजस्य करार
- ७,०३० रोजगारनिर्मितीचा मार्ग मोकळा

मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रात गुंतवणूक करणाऱ्या उद्योगसमूहांसाठी राज्य शासनाने सुलभ आणि विश्वासार्ह व्यवस्था निर्माण केली असून गुंतवणुकदारांचा अनुभव पूर्णपणे अडथळामुक्त राहील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री डॉ.उदय सामंत यांच्या उपस्थितीत विधानभवन, मुंबई येथे उद्योग विभागाच्या वतीने आठ कंपन्यांसोबत सामंजस्य करार करण्यात आले. यावेळी उद्योग विभागाचे प्रधान सचिव डॉ.पी. अन्बळगण, उद्योग सहसचिव डॉ.श्रीकांत पुलकुंडवार तसेच आठ कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. या करारांमुळे राज्यात सुमारे 44,710 कोटी रुपयांची गुंतवणूक होणार असून 7,030 रोजगारनिर्मिती होण्याची अपेक्षा आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, राज्य शासनाने गुंतवणूकदारांसाठी आवश्यक असलेली यंत्रणा उभी केली आहे. शासन आणि उद्योगक्षेत्र एकत्रितपणे प्रगती करू शकतो, असा महाराष्ट्राचा सिद्ध झालेला अनुभव आहे. त्यामुळे प्रशासकीय बाबींमध्ये काही अडचण आल्यास शासन त्यांना सर्वतोपरी मदत करेल. उद्योगांना आवश्यक असलेल्या सर्व परवानग्या वेळेत मिळाव्यात यासाठीही शासन प्रयत्नशील राहील. आज झालेल्या या करारांनुसार विविध औद्योगिक क्षेत्रांमध्ये गुंतवणूक होणार असून त्यामध्ये एरोस्पेस, डेटा सेंटर, स्टील, ग्रीन इनिशिएटिव्ह, हायड्रोजन व नैसर्गिक वायू साठवण प्रणाली, फायबर उत्पादन अशा आधुनिक आणि महत्त्वाच्या क्षेत्रांचा समावेश आहे.

या सामंजस्य करारांमध्ये रेटाविया प्रा. लि. (नांदेड) यांचा हेलिप्लांट प्रकल्प (4,250 कोटी), एसीई गॅसेस टेक्नॉलॉजीज प्रा. लि. (दिंडोरी, नाशिक) यांचा एसीई गॅसेस, लिक्विड मेडिकल ऑक्सिजन (750 कोटी), टाटा टेक्नॉलॉजीज लि. (नागपूर, पुणे, नाशिक, छ. संभाजीनगर) यांचा एरोस्पेस व संरक्षणसंबंधित साहित्य (4,800 कोटी), जेके इन्फोटेक (हिंजवडी, पुणे) यांचा डेटा सेंटर ग्रीन इनिशिएटिव्ह (1,000 कोटी), एस.एम. स्टील्स अँड पॉवर लि. (सलोरी, चंद्रपूर) यांचा इंटिग्रेटेड स्टील व स्पेशल स्टील कॉम्प्लेक्स (20,000 कोटी), कोनार्क सॉफ्टकोर सोल्यूशन्स प्रा. लि. (हिंजवडी, पुणे) यांचा डेटा सेंटर (1,600 कोटी),




अॅडव्हांटेक फ्युएल सिस्टीम प्रा. लि. (सुपा-पारनेर एमआयडीसी, अहिल्यानगर) या हायड्रोजन व नैसर्गिक वायू साठवण प्रणाली (400 कोटी) आणि इन्फिनिटीटेड फायबर कंपनी (पीएम मित्रा पार्क, अमरावती) यांचा सर्क्युलर फायबर सेंटर (11,910 कोटी) यांचा समावेश आहे. या प्रकल्पांमुळे नांदेड, नाशिक, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, चंद्रपूर, अहिल्यानगर आणि अमरावती या भागांमध्ये औद्योगिक विकासाला चालना मिळणार आहे. तसेच राज्यातील या नव्या गुंतवणुकीमुळे स्टील, माहिती तंत्रज्ञान, अवकाश व संरक्षण साहित्य, वस्त्रोद्योग आणि हरित ऊर्जा यांसारख्या क्षेत्रांत विकासाला चालना मिळणार असून, राज्यातील औद्योगिक वाढीसह मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होण्यास मदत होणार आहे.

## अध्यक्ष बिर्लांविरोधातील अविश्वास प्रस्ताव फेटाळला

नवी दिल्ली (दै. संध्या)



बुधवारी, लोकसभेत अध्यक्ष ओम बिर्ला यांना त्यांच्या पदावरून हटवण्यासाठीचा अविश्वास प्रस्ताव आवाजी मतदानाने फेटाळण्यात आला. सभागृहाच्या कामकाजादरम्यान त्यांच्यावर भेदभाव केल्याचा आरोप करण्यात आला. तत्पूर्वी, गृहमंत्री अमित शहा यांनी ५६ मिनिटांचे भाषण केले. यादरम्यान, त्यांनी राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षावर जोरदार हल्ला चढवला, १७ व्या आणि १८ व्या लोकसभेत त्यांना बोलण्यासाठी मिळालेल्या मर्यादित वेळेची आठवण करून दिली. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की सभागृह नियमांनुसार चालेल. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या कोणालाही थांबवण्याचा आणि व्यत्यय आणण्याचा अध्यक्षांना अधिकार आहे. हे सभागृह जत्रा नाही; जे नियमांचे पालन करत नाहीत त्यांचे मायक्रोफोन बंद केले जातील. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे नाव न घेता शाह म्हणाले, "भाऊ, आपल्याला येथे नियमांनुसार बोलावे लागते. येथे इतके ज्येष्ठ सदस्य बसले आहेत. मला अजूनही शशी थरूर आणि बालू साहेब इथे बसलेले आहेत हे समजत नाही. तुम्ही त्यांना का शिकवत नाही?"

## गॅसचा काळा बाजार रोखण्यासाठी शासन यंत्रणा अलर्ट मोडवर

जेजुरी (दै. संध्या)

इराण युद्धामुळे इंधन तसेच गॅस पुरवठा सुरळीत नसले बाबत नागरिकांमध्ये संभ्रम राहू नये, तसेच याबद्दल अफवा पसरवू नये म्हणून प्रशासन विशेष खबरदारी घेत आहे. त्यामुळे घरगुती गॅस (LPG) चा काळाबाजार रोखण्यासाठी तालुका प्रशासन अलर्ट मोडवर असून जिल्हाधिकारी पुणे यांचे मार्गदर्शनाखाली काळाबाजार रोखण्यासाठी धडक मोहीम राबविण्यात येत आहे. सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक गॅस पुरवठा सुरळीत सुरु राहावा यासाठी प्रशासनाकडून खबरदारी घेण्यात येत असून काळाबाजार, अवैध वापर करणाऱ्यांवर थेट गुन्हा दाखल करण्यात येणार असल्याचे तहसीलदार पुरंदर



विक्रम राजपूत यांनी स्पष्ट केले आहे. सद्यपरिस्थिती विचारात घेता घरघुती गॅस बाबत खालील प्रमाणे सूचना देण्यात येत आहेत. सर्व गॅस एजन्सीज यांनी पारदर्शक वितरण ठेवावे. कोणताही गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. घरघुती गॅसचा व्यावसायिक आस्थापना साठी वापर होणार नाही याची काळजी घ्यावी. ग्राहकांना अडचण होईल, रक्कम जास्त घेतली जात आहे, कृत्रिम टंचाई असे प्रकार होणार नाहीत याची खबरदारी घ्यावी. शासनाच्या सूचनानुसार प्राधान्य क्रमानुसार वितरण होईल याची अंमलबजावणी करावी. व्यावसायिक आस्थापना यांनी कोणत्याही परिस्थिती मध्ये घरघुती गॅस वापर करू नये. असे निदर्शनास आल्यास प्रचलित नियमानुसार थेट गुन्हा दाखल करण्याची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी. नागरिकांना आवाहन करण्यात येते कि तालुक्यात घरघुती गॅसचा पुरेसा साठा आहे. नियमित पुरवठा सुरु आहे. त्यामुळे नागरिकांनी अस्वस्थ होऊन अनावश्यक भीती बाळगू नये. अफवांवर विश्वास ठेऊ नये. एजन्सीवर गर्दी होईल असे करू नये. नियमानुसार बुकिंग निश्चित करण्यात यावी. घरगुती गॅस काळाबाजार, अवैध वापर, नफाखोरी असे प्रकार निदर्शनास आल्यास थेट कारवाई करण्यात येईल. काळाबाजार रोखण्यासाठी भरारी पथक स्थापन केले असून हॉटेल, उद्योग यांची तपासणीची धडक मोहीम या पथकामार्फत करण्यात येणार आहे.

## मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी सरकारची

*आरक्षणाच्या प्रश्नावर मनोज जरांगेंचा संताप; नाहीतर २०२९ मध्ये पराभव ठरलेला, आमदारांना इशारा*

मुंबई (दै. संध्या)



मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा राज्य सरकार आणि लोकप्रतिनिधींवर टीकेची झोड उठवली आहे. मराठवाड्यासाठी सरकारने काढलेल्या शासन निर्णयानंतर आता मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी सरकारची असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. जर मराठा समाजाला अपेक्षित प्रमाणपत्र मिळाले नाही, तर 2029 च्या निवडणुकीत संबंधित आमदारांना पराभवाचा सामना करावा लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.

लातूर जिल्ह्यातील माकणी थोर येथे आयोजित श्री हनुमान आराधना कार्यक्रमानंतर माध्यमांशी बोलताना जरांगे पाटील यांनी ही भूमिका मांडली. त्यांनी सांगितले की, मराठवाड्यासाठी मराठा आरक्षणासंदर्भात शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे. त्यामुळे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी आता सरकारवर आहे. जर प्रमाणपत्र मिळत नसेल, तर मराठवाड्यातील नागरिकांनी आपल्या भागातील आमदारांना थेट प्रश्न विचारावा, असे आवाहन त्यांनी समाजाला केले.

जरांगे पाटील यांनी पुढे सांगितले की, मराठा समाजाला आरक्षण मिळवून देण्यासाठी जे आमदार पुढे येणार नाहीत, त्यांना 2029 च्या निवडणुकीत मतदार धडा शिकवतील. प्रमाणपत्र देण्याची जबाबदारी सरकार आणि आमदारांनी स्वीकारली पाहिजे. अन्यथा समाज त्यांना निवडणुकीत पाडेल, असा स्पष्ट इशारा त्यांनी दिला. मराठा समाजाला न्याय मिळावा यासाठी आंदोलन सुरूच राहील, असेही त्यांनी नमूद केले. दरम्यान, समाजाकडून वेळ मागितल्याचा उल्लेख करताना जरांगे म्हणाले की, त्यांनी यापूर्वी समाजाला एक वर्षाचा वेळ देण्याची विनंती केली होती. मात्र सतत विविध कार्यक्रमांमुळे आणि घडामोडींमुळे परिस्थिती बदलत आहे. तरीही समाजाचा माझ्यावर विश्वास आहे आणि माझाही समाजावर पूर्ण विश्वास आहे, असे त्यांनी सांगितले. समाजासाठी काम करायचे असून संघटना उभी करण्यापेक्षा लोकांच्या अडचणी सोडवण्यासाठी कार्यक्षम यंत्रणा उभी करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी त्यांनी काही संवेदनशील मुद्द्यांवरही भाष्य केले. आपल्याविरोधात सुपारी दिल्याच्या चर्चेबाबत सध्या अधिक बोलणार नसल्याचे त्यांनी सांगितले. मात्र या प्रकरणात लवकरच मोठे खुलासे होऊ शकतात, असे संकेत त्यांनी दिले. पोलिसांच्या तपासात अनेक महत्त्वाच्या बाबी समोर येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच महादेव मुंडे हत्याप्रकरणाबाबत गृह विभागाच्या कानावर हा विषय टाकल्याचे त्यांनी सांगितले.

## लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांच्या संख्येत घट!

मुंबई (दै. संध्या)

महायुती सरकारची महत्त्वाकांक्षी ठरलेली योजना म्हणजे मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना. विधानसभा निवडणुकीपूर्वी या योजनेची सुरुवात करण्यात आली व त्यानंतर विधानसभेत महायुतीला बहुमत मिळाले होते. मात्र, आता या योजनेची झळ सरकारी तिजोरीवर पडत असल्याचे बोलले जात असून लाभार्थी महिलांच्या संख्येत मोठी घट होणार असल्याचे देखील बोलले जात आहे. यावर महिला व बाल कल्याण विकास मंत्री अदिती तटकरे यांनी ट्विट करत हे वृत्त फेटाळून लावले आहे. अदिती तटकरे यांनी ट्विट करत म्हटले की, मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतील लाभार्थ्यांच्या कपातीबाबत काही




माध्यमांकडून प्रसारित करण्यात आलेल्या बातम्या चुकीच्या व तथ्यहीन आहेत. दिनांक 31 मार्च 2026 पर्यंत लाडक्या बहिणींना E-Kyc करण्याची संधी देण्यात आलेली आहे. ही प्रक्रिया अजूनही सुरू असून याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती विभागाकडून प्रसिद्ध करण्यात आलेली नाही. तसेच या संदर्भात कोणतेही वृत्त प्रसारित करण्यापूर्वी माध्यमांनी तथ्यांची पडताळणी करावी, असे आवाहन तटकरे यांनी केले आहे.

# आरोग्य विमाधारक केंद्रबिंदू मानून विमा कंपन्या व रुग्णालयांनी सेवा द्यावी

मुंबई (दै. संध्या)

- आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर
- विमाधारकांच्या तक्रारींची शासन करणार शहानिशा

आरोग्य विमा कंपन्यांकडून क्लेम मंजुरीत येणाऱ्या अडचणी व रुग्णालयांची अवाजवी वैद्यकीय बिले याबाबतच्या तक्रारीच्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण, खासगी विमा कंपन्या व खासगी रुग्णालये यांची संयुक्त बैठक आयोजित केली होती. रुग्ण हा केंद्रबिंदू मानून खासगी विमा कंपन्या व रुग्णालयाने सेवा द्यावी असे निर्देश आरोग्यमंत्र्यांनी या बैठकीत दिले. आरोग्य विमा कंपन्यांकडून क्लेम मंजुरीत येणाऱ्या अडचणी व खासगी रुग्णालयाकडून आकारली जाणारी आवाजवी बिले. याबाबत आरोग्यमंत्र्यांकडे तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. त्या अनुषंगाने याबाबत निश्चित कार्यपध्दती निर्धारीत करण्यासाठी आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी मंत्रालयात बैठक आयोजित केली होती. बैठकीस रिलायन्स, टाटा, एसबीआय, स्टार हेल्थ, एचडीएफसी, एआयजी, यासह राज्यातील प्रमुख विमा कंपन्या तसेच व्होकार्ड, लीलावती, जसलोक, रिलायन्स



यासह राज्यातील प्रमुख रुग्णालयांचे प्रतिनिधी उपस्थित होते. विमा कंपनी आणि रुग्णालय व्यावसायिक पद्धतीने काम करत असली तरी रुग्ण हा केंद्रबिंदू असला पाहिजे. आरोग्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार विमा कंपन्या, खासगी रुग्णालये, भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण व आरोग्य विभागाचे प्रतिनिधी एका व्यासपिठावर येऊन रुग्ण कल्याणासाठी निश्चित कार्यपध्दती निर्धारित करण्याबाबत चर्चा झाली. आरोग्यविमा घेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणावर वाढत असुन त्यांना समाधानकारक सेवा देणे हे रुग्णालये व विमा कंपन्यांची जबाबदारी आहे. याबाबत चुकीचे निदर्शनास आल्यास शासन त्याबाबत योग्य ती कार्यवाही करेल. राज्यात मुंबई, पुणे, नागपूर सारख्या शहरात अद्यावत वैद्यकीय सेवा, तज्ञ डॉक्टर्स, व पायाभूत सुविधा उपलब्ध असल्यामुळे, मेडिकल टुरिझम व्यवसायाला मोठा वाव आहे. चांगली सेवा देऊन आपली विश्वासार्हता वाढवावी असेही आरोग्यमंत्र्यांनी सांगितले

राज्यातील सर्व रुग्णालयांनी भारतीय विमा नियामक आणि विकास प्राधिकरण ( आयआरडीए ) च्या पोर्टलवर नोंदणी करून आवश्यक माहिती अद्ययावत ठेवावी, असे निर्देश देतानाच क्लेम मंजुरीसाठी निश्चित कालमर्यादा ठरविण्याची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली. हॉस्पिटल आणि विमा कंपन्यांमधील समन्वयाच्या अभावामुळे अनेकदा रुग्णांना मानसिक तसेच आर्थिक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे रुग्णांना तात्काळ उपचार मिळावेत आणि क्लेम प्रक्रिया अधिक पारदर्शक व सुलभ व्हावी यासाठी शासन आवश्यक ते निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# संपादकीय

## बाराला ८५ सेकंद कमी!

जगाच्या विनाशासाठी इंग्लिशमध्ये 'डूम्स डे' असा शब्दप्रयोग केला जातो. दुष्काळ- महापूर, भूकंप यांसारख्या नैसर्गिक आपत्तींवर किंवा जगभर मृत्यूचे थैमान घालणाऱ्या करोनासारख्या साथरोगावर मात करून मानवाने यापूर्वी अनेकदा नव्याने उभारी घेतली आहे. जगाचा अंत होणार नसल्याचा आशावाद यातून निर्माण होतो. मात्र, जगाच्या विनाशाची शक्यता कायमस्वरूपी मिटलेली नाही. याला कारण आहे, मानवी वर्तन. नैसर्गिक आपत्तींना जिद्दीने सामोरी जाणारी माणसे सत्तेचा हव्यास, वर्चस्ववाद अन् श्रेष्ठत्वाचा अहंकार यांमुळे सारासार विवेकबुद्धी गमावून लढणे काही सोडत नाहीत. अशा लढायांमुळे, युद्धांमुळे आणि त्यातील संहारक शस्त्रांमुळे ते जगाला विनाशाच्या उंबरठ्यावर नेऊन ठेवतात. गेल्या चार वर्षांपासून रशिया-युक्रेन युद्ध सुरू आहे. इस्रायल-हमास यांच्यातील युद्ध संपले असले, तरी अमेरिका-इस्रायल यांनी इराणवर हल्ले करून नवीन युद्ध छेडले आहे. यामुळे आपण 'डूम्स डे'च्या नजीक आलो आहोत काय? पृथ्वीच्या विनाशापासून आपण किती जवळ आलो आहोत, हे सांगण्याचा एक उपक्रम १९४७पासून सुरू आहे. याला पार्श्वभूमी आहे, ती दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेने जपानवर टाकलेल्या अणुबॉम्बची. बॉम्बनिर्मितीच्या प्रकल्पातील शास्त्रज्ञांनी नंतर 'बुलेटिन ऑफ ॲटोमिक सायंटिस्ट्स' हे मासिक सुरू केले अन् त्यात त्यांनी सांकेतिक घड्याळ (डूम्स डे क्लॉक) छापण्यास सुरुवात केली. १९४७मध्ये हे घड्याळ प्रथम प्रसिद्ध झाले; त्या वेळी त्यांनी बाराला सात मिनिटे कमी असल्याचे दाखवले. मध्यरात्रीचे बारा म्हणजे 'डूम्स डे'असे मानून विनाशापासून आपण सात मिनिटे दूर असल्याचे त्यांनी त्यावेळी सूचित केले. अण्वस्त्रासह एकूणच युद्धाचा धोका अधोरेखित करून जगाला संघर्षापासून सावध करणे, हा या घड्याळामागचा उद्देश. त्यानंतर आंतरराष्ट्रीय ताण-तणाव, युद्ध, अण्वस्त्रप्रसार यांनुसार या घड्याळ्यातील एक काटा पुढे-मागे केला जाऊ लागला. 'पुढे' म्हणजे विनाशाच्या जवळ आणि 'मागे' म्हणजे विनाशापासून दूर. कालांतराने, वैश्विक तापमानवाढ आणि कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) वापर यांचाही काटा पुढे-मागे करण्यासाठी विचार होऊ लागला. 'डूम्स डे' घड्याळातील काटा आत्तापर्यंत १९ वेळा पुढे नेण्यात आला, तर आठ वेळा मागे. भारताने १९७४मध्ये आणि १९९८मध्ये अणुचाचणी केली; १९९८मध्ये पाकिस्ताननेही चाचणी केली. या दोन्ही वेळी काटा पुढे सरकविण्यात आला होता. १९९१मध्ये शीतयुद्ध अधिकृतपणे संपले तेव्हा हा काटा तो बारापासून सतरा मिनिटे मागे नेण्यात आला. 'डूम्स डे'पासूनची सर्वांत दूरची वेळ हीच होती; आणि आत्ता हे घड्याळ सर्वांत जवळची वेळ दाखवीत आहे : बाराला ८५ सेकंद कमी! ही वेळ आहे, यंदाच्या जानेवारीतील. जगातील एकूण युद्धस्थिती पाहून या घड्याळातील काटा पुढे सरकवण्यात आला असून, विनाशापासून पृथ्वी दीड मिनिटाहून कमी वेळाच्या अंतरावर आली, असा याचा अर्थ. तो सांकेतिक असला, तरी काटा पुढे करून शास्त्रज्ञांनी सध्याच्या जगातील युद्धखोरीचा, अण्वस्त्रप्रसाराचा, तसेच तापमानवाढीकडील दुर्लक्षाचा आणि 'एआय'वरील अतिअवलंबित्वाचा धोका अधोरेखित केला आहे. अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील युद्ध सुरू होण्याच्या आधीच काटा पुढे सरकवण्यात आला आहे. अमेरिका, रशिया, चीन यांसह अनेक देश आक्रमक बनले असून, युद्धखोरी करीत आहेत; त्यामुळे जगात एकाच वेळी अनेक युद्धे सुरू आहेत.

हा संघर्ष जगाला विनाशाच्या टोकावर नेऊ शकतो, असे 'बुलेटिन ऑफ ॲटोमिक सायंटिस्ट्स'चे म्हणणे. ते चुकीचे नाही. पश्चिम आशियातील युद्धाचे चटके संपूर्ण जगाला बसत आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची विधाने आणि इराणचे प्रत्युत्तर पाहता युद्ध इतक्यात संपण्याची चिन्हे नाहीत. 'डूम्स डे' घड्याळ अर्थहीन असल्याची टीका अनेकदा झाली असली, तरी मानवाला विनाशाकडे नेणाऱ्या बेपर्वाईबद्दल ते आपणा सर्वांना सावधानतेचे ठोके देत आहे, हे नाकारता येणार नाही.

## संस्कृत सुभाषित

अप्राप्तकालं वचनं बृहस्पतिरपि ब्रुवन्
लभते बुद्ध्यवज्ञानमवानं च भारत ॥
(उद्योगपर्व, अध्याय ३९, २ महाभारत)

अर्थ – समयाला न शोभणारे भाषण करणारा बृहस्पती जरी असला तरी त्याचा तिरस्कार होतो व तो सुद्धा अपमानाला पात्र होतो.

## गुरु वचन

### समान भावाने सेवा

एका वेळची गोष्ट आहे. ईश्वरचंद विद्यासागर यांच्याजवळ त्यांच्या मित्राचा एक नोकर काही कामानिमित्त आला. विद्यासागर बाहेर आले आणि त्यांनी पाहिले तर घराच्या खाली एक वयस्कर व्यक्ती उभा होता. आणि तो खूप थकलेला होता. अशा स्थितीत तो वरती येण्यास असमर्थ होता. हे पाहून विद्यासागर त्या व्यक्तीसाठी पिण्यास पाणी घेऊन आले आणि परत जाऊन पंखा घेऊन आले आणि स्वत: हवा मारु लागले. विद्यासागरना असे करताना पाहून त्यांचा मित्र म्हणाला ज्या व्यक्तीस आपण पाणी पाजत आहात आणि पंख्याने हवा मारत आहात तो एक सामान्य सेवक आहे. मित्राचे हे बोलणे ऐकून विद्यासागर म्हणाले ठीक आहे, हा एक सेवक आहे, परंतु माणूसच आहे.

यावरुन विद्यासागर यांनी मित्राला आपल्या लहानपणीची एक गोष्ट सांगितली, माझे वडील एकदा बाजारात चक्कर येऊन पडले. तेथे चन्ना विकणाऱ्या एका व्यक्तीने आपले काम सोडून ताबडतोब पाणी आणले आणि त्याचा शिडकावा मारला आणि नंतर पंखा आणून त्याने हवाही मारु लागला, असे करत असताना तो आपले सामानही विसरुन गेला. त्याला केवळ माझ्या वडिलांची चिंता होती. थोड्याच वेळात जेव्हा माझे वडील उठून बसले. तेव्हा त्यांनी त्या व्यक्तीचे आभार मानले. या घटनेमुळे मी एवढा प्रभावित झालो की, त्यानंतर कोणत्याही व्यक्तीची मदत करणे आपला धर्म मानला. शेवटी म इयासाठी ही गोष्ट कोणतेच बंधन ठेवत नाही की, कोणी व्यक्ती उच्च जातीचा आहे की, खालच्या जातीचा आहे. छोटा असो व मोठा मी सर्वांना समान समजतो. आणि त्यांची समान भावानेच सेवा करतो.

## उपदेशकथा

### निराधार

कृष्ण जेवत होते. दोन घास खाल्ले आणि ताट बाजूला सारून ते दरवाजाकडे गेले. रुक्मिणी म्हणाली, 'असं भरल्या ताटावरून कुणी उठतं का?' काहीही उत्तर न देता कृष्ण दरवाजापर्यंत गेले आणि परत येऊन जेवू लागले. रुक्मिणीने विचारताच ते म्हणाले, 'माझा आवडता भक्त रस्त्यातून जात होता. काही लोक त्याला दगड मारीत होते. रक्ताळलेल्या अवस्थेतही तो हसत होता. त्याला माझी गरज होती, म्हणून उठलो होतो.' रुक्मिणी म्हणाली, 'मग परत का आलात?' कृष्ण म्हणाला, 'दरवाजाजवळ गेलो तेव्हा त्याला माझी गरज राहिली नव्हती. त्या भक्ताने स्वत:च दगड घेऊन प्रत्युत्तर द्यायला सुरवात केली होती. जोपर्यंत तो निराधार होता तोपर्यंत त्याचे प्राण मला चुंबकाप्रमाणे खेचून घेत होते. आता तो निराधार नाही. त्याला दगडाचा आधार आहे. त्याच्याजवळ ताकद आहे. तो लढतो आहे. अशावेळी त्याला माझा आधार देऊन निर्बल बनविणे योग्य नाही.'

कथा उपदेश : आपले हात–मन भरलेले आहे, तोपर्यंत परमात्म्याचा आधार नाही. जेव्हा त्याचा आधार लाभतो, तेव्हा माणूस संपूर्ण निराधार होतो. निर्बल आणि दुर्बल होतो.

## पंचांग

| पंचांग | करण:तैतिल १७:२७:१५ |
|---|---|
| १२ मार्च २०२६ | करण:गर ३०:२९:१५+ |
| गुरूवार | सूर्य:कुम्भ |
| विक्रम संवत्– २०८२ | चन्द्र:धनु |
| फाल्गुन शके | हिजरी सन् – १४४६ |
| संवत्– १९४७ | मुस्लिम मास – रमजान |
| संवत्सर – विश्वावसूनाम | तारीख – २२ |
| अयन– उत्तरायणारंभ | विशेष |
| मास– फाल्गुन | यशवंतराव चव्हाण जयंती |
| ऋतु– सौर वसंत | मामा महाराज देशपांडे |
| कृष्ण पक्ष | पुण्यतिथी – पुने |
| तिथि:नवमी ३०:२९:१५+ | देव महाराज पुण्यतिथी |
| नक्षत्र:मूल २४:४३:२०+ | – कार्ला (यवतमाळ) |
| योग:सिद्ध ०९:५८:०८ | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. ८८४

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2 | | 3 | | | 7 | | 5 |
| 5 | 6 | | | 1 | | 2 | | 9 |
| | | | | | | | 6 | |
| 4 | 3 | | | 2 | | | | 7 |
| 1 | | 8 | 9 | | 4 | 5 | | 6 |
| 6 | | | | 8 | | | 3 | 1 |
| | 8 | | | | | | | |
| 3 | | 7 | | 4 | | | 1 | 2 |
| 9 | | 4 | | | 3 | | 5 | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. ८८३ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 2 | 6 | 1 | 3 | 7 | 5 | 8 | 9 |
| 9 | 7 | 5 | 2 | 8 | 4 | 3 | 6 | 1 |
| 1 | 3 | 8 | 9 | 5 | 6 | 4 | 2 | 7 |
| 3 | 6 | 9 | 8 | 4 | 5 | 7 | 1 | 2 |
| 7 | 4 | 1 | 6 | 9 | 2 | 8 | 3 | 5 |
| 5 | 8 | 2 | 3 | 7 | 1 | 9 | 4 | 6 |
| 2 | 9 | 4 | 7 | 6 | 3 | 1 | 5 | 8 |
| 8 | 1 | 3 | 5 | 2 | 9 | 6 | 7 | 4 |
| 6 | 5 | 7 | 4 | 1 | 8 | 2 | 9 | 3 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९०४ – इंग्लंडमध्ये विजेवर चलणारी पहिली रेल लैवरपोल ते सौथपोर्ट दरम्यान धावली.
- १९८२ – वेस्ट इंडीजचा गोलंदाज कॉटर्नी वॉल्शने प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केले.
- २००८ – मेलबर्न–ऑस्ट्रेलियातील १३ रुग्णांच्या मृत्यूसाठी जबाबदार ठरलेल्या डॉ जयंत पटेल (डॉ.'डेथ') याला अमेरिकेतील ऑरिगाँ राज्यात, एफबीआयने अटक केली.

### राष्ट्रीय

- १९३० – महात्मा गांधी यांनी दांडी यात्राला सुरुवात केली.
- १९९३ – मुंबईत बॉम्बस्फोटात ३१७ जण ठार.
- २००७ – भारताचा अत्याधुनिक संचार उपग्रह इन्सॅट ४ –बी ची प्रेंफ्च गुएना एरियन–५ यानाद्वारे यशस्वी चाचणी करण्यात आली.
- २००८ – कुख्यात माफिया डॉन अबू सालेम याच्याविरुद्ध मोक्का कायद्याखाली दाखल करण्यात आलेला गुन्हा काढून घेण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारने घेतला.

### जन्म

- १८८१ – रिपब्लीक तुर्कीचे पहिले राष्ट्रपती केमल अटातर्क यांचा जन्म.
- १९११ – मेक्सिकोचे राष्ट्रपती गुसतावो डीअज ओरडज यांचा जन्म.
- १९२७ – अर्जेंटिनाचे राष्ट्रपती राउल अलफांसो यांचा जन्म.
- १९३८ – भारतीय कसोटीपटू विजय मेहरा यांचा जन्म.

### निधन

- १९५८ – स्विडनची राजकुमारी इंगेबर्गचे निधन.
- १९९३ – चीनचे उपपंतप्रधान वांग झेन यांचे निधन.
- १९९६ – हंग्रीचे पंतप्रधान ग्युला कल्लाइ यांचे निधन.

## : SMS :

A sardar on an interview 4 da post detective. Interviewer : who killed Gandhi? Sardar : Thank u sir 4 giving me d job, I will start investigating

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३४.२ | २२.४ |
| अहमदनगर | ३३.२ | २२.३ |
| अकोला | ३६.८ | २४.५ |
| अमरावती | ३६.१ | २४.१ |
| बीड | ३७.८ | २३ |
| भंडारा | ३७.६ | २२.२ |
| बुलढाणा | ३४.३ | १७.७ |
| चंद्रपूर | ३८.६ | २३.२ |
| चेन्नई | ३३.६ | २०.८ |
| नवी दिल्ली | ३३.९ | २०.५ |
| धुळे | ३५.६ | २४ |
| गोंदिया | ३६.१ | २१.३ |
| जळगाव | ३७ | २३.९ |
| कोल्हापूर | ३४ | २०.९ |
| लातूर | ३४ | २१.४ |
| मुंबई | ३७.२ | २८.४ |
| नागपूर | ३६.६ | २२.५ |
| नांदेड | ३६.५ | २२.९ |
| नंदूरबार | ३४.२ | २५.५ |
| नाशिक | ३४.३ | २०.६ |
| पुणे | ३२.३ | २१.१ |
| पंढरपूर | ३५.३ | २३.८ |
| सातारा | ३४.१ | १९.८ |
| सांगली | ३५ | २१.२ |
| सोलापूर | ३५.३ | २४.३ |
| वर्धा | ३७.३ | २४.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** महत्वाचे निर्णय घेण्यास व्यवसायातील महत्वाचे करार–मदार करण्यास आजचा दिवस चांगला आहे.

**तुळ :** विरोधक व हितशत्रूंचे मनसुबे हाणून पाडण्यात यशस्वी व्हाल. व्यवसायाच्या दृष्टीने आजचा दिवस पर्वणीचा ठरणार आहे.

**वृषभ :** संततीसौख्य लाभेल. मुलामुलींसंदर्भात एखादी भाग्यकारक घटना घडेल. त्यांचे काही प्रश्न असल्यास ते मार्गी लावाल.

**वृश्चिक :** वाहने सावकाश व जपून चालवावीत. तुमची चीडचीड होणार आहे. आरोग्याच्या थोड्याफार तक्रारी जाणवतील.

**मिथुन :** आर्थिक लाभाचेदृष्टीने एखादी नवी योजना नजरेसमोर येईल. व्यवसायात नवीन कल्पना अंमलात आणू शकाल. दिवस फारसा अनुकूल नाही.

**धनु :** नातेवाईकांशी मतभेदाची शक्यता आहे. मानसिक अस्वास्थता जाणवेल. प्रकृतीकडे लक्ष द्यावयास हवे. प्रवास शक्यतो टाळावेत.

**कर्क :** जिद्दीच्या जोरावर तुम्ही तुमची आजची कामे पार पाडू शकाल. वाहने जपून व सावधानतेने चालवावीत. प्रवास टाळावेत.

**मकर :** नवीन हितसंबंध निर्माण होतील. अपेक्षित गाठीभेटी पडतील. सध्या आपणाला नातेवाईकांचे सहकार्य मिळणार नाही, हे गृहितच धरावयास हवे.


**सिंह :** महत्वाचे निर्णय नकोत. काहींची प्रगती होईल. मिथुन : आज तुम्हाला महत्वाच्या आर्थिक कामांत पत्नीचा सल्ला उपयोगी ठरणार आहे.

**कुंभ :** आज पूर्ण दिवस तुम्ही उत्साहाने व उमेदीने कार्यरत राहणार आहात. आरोग्य उत्तम राहील. व्यवसायात नवीन बाजारपेठ मिळवू शकाल.

**कन्या :** वैवाहिक सौख्य उत्तम लाभेल. मित्रांचे सहकार्य उत्तम लाभेल. अपेक्षित गाठीभेटी पडतील. उत्साह व उमेद वाढेल. प्रवास सुखकर होतील.

**मीन :** महत्वाचे निर्णय घेण्यास तसेच आगामी काळाचे नियोजनास दिवस अनुकूल आहे. आरोग्य उत्तम राहील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. ८८४



### आडवे शब्द

१. शरीर
३. '– –––– ––– तोचि आवडे देवाला'
१०. सद्य, चालू
११. गणपती
१३. भांडकुदळ
१४. देवीने मारलेला राक्षस
१६. वक्राकार
१८. पेरणी
२१. मतभेद
२२. पर्वा
२३. पाणी
२६. अव्यवस्थित
२८. पूर्वज
२९. बगळा
३०. पूर्ण भरतीची वेळ
३१. मजा
३२. आकांक्षा
३३. काटकी
३४. देव
३५. अल्प
३६. 'क्षसागरा धरणी मिळते, तिथे तुझी मी वाट पाहते'
३९. पहाड
४०. गजानन
४२. वास्तव
४४. कामवाली
४६. आपला देश
४७. त्याप्रमाणे
४९. तृण
५०. वायू
५१. मंत्रांचे उद्गाते
५२. छाननी
५३. चोप
५४. अभिप्राय
५५. सध्या
५६. नवरदेव
५७. एक भारतीय तंतुवाद्य
५८. ऐकलेले
५९. खंदक
६०. थोडे
६१. सुग्रीवाचा भाऊ
६२. गाव
६४. हरवलेले
६५. डझन
६६. स्वंयपाक करण्याचे साधन
६८. संध्याकाळची वेळ
७१. लेखी ठरवलेली गोष्ट
७२. नियंत्रण, ७३. मिठी
७४. अभिनेता, ७५. प्रयोजन
७६. सैन्याचा प्रमुख
७८. दाणादाण, फजिती
७९. वेदांची संख्या
८०. नव्वद हिंदीत
८१. तोपर्यंत
८२. सळई
८३. ––– –– तिकडे विहीर
८४. पांडवांचा सहावा भाऊ
८५. शिखर

### उभे शब्द

१. यायातीचा बायको
२. शिव
४. अंक, संख्या
५. कमी, उणे
६. अंगरखा
७. रियाझ
८. नाव
९. खेद
१०. राखून ठेवलेले
१२. औषध
१५. थंडीचा ऋतू
१७. करणारा
१९. मैत्री
२०. गोंधळणे, कच खाणे
२२अ. किनारा
२४. दुधाचा घट्ट पदार्थ
२५. शिल्लक ठेव, २७. थाप
२८. नेट, तगादा
३०. लाकूडफाटा, जळण
३२. या ठिकाणी
३३. घटस्फोट
३५. कमी बोलणारा
३७. '– ––– –– त्याच गावच्या बाभळी'
३८. सुकुमार
४०. अवस्था
४१. जेवणानंतरचा हलका व्यायाम
४३. रमलेला
४५. पद्धत, ४८. नवऱ्याचे घर
५१. सत्य
५३. कुरघोडी
५४. उत्साहाचा अभाव
५५. खात्री
५७. टांग
५८. रेडिओवरचा नाट्यप्रयोग
६०. मळलेले
६१. मरुत
६२. नगरपालिकेतील लोकप्रतिनिधी
६३. मग्न
६५. सूक्ष्म तपशील
६६. चिवड्याची जोडीदार
६७. आलेला, प्रकटलेला
६९. निष्णात
७०. समय
७२. शपथ
७३. चहाचा पेला
७४. कंठ
७५अ. दर्दी, अभिरुचीसंपन्न
७७. श्रीफळ
७८. याच्यामागे प्रेम असल्यास हृदय विदीर्णच झाले म्हणायचे!
७९. चक्र
८०. अडचण

### जम्बो शब्दकोडे क्र. ८८३ चे उत्तर

आडवे उत्तर : १.लालूप्रसाद यादव ७.अचानक ९.कोस ११.हर १२.दरसाल १४.पलायन १५.नगर १६.कवी १७.हटवादी २०.लस २१.वर्ण २२.वात २३.सनदशीर २६.लज्जास्पद २७.दारू २९.वाया ३०.कपटी ३२.नीरस ३४.ससाणा ३६.अमर ३७.कसकस ३८.रामराम ४१.पातक ४३.रम ४४.आसन ४५.दाखला ४६.जळजळ ४७.नरम ४८.कास ५१.घेवडा ५२.वदंता ५२अ.महाराजा ५३.त्राता ५४.ओळख ५६.डक ५७.थडगे ५८.पार ६०.वेतन ६२.चरा ६४.डफली ६६.दरवळ ६८.कसा ७०.मजा ७०अ. खो ७१.वाल ७२.साखर ७३. समाचार ७४.तळवा ७६.बाळ ७८.बन ७९.क्षालन ८०.टक्का ८१.मनमुराद

उभे उत्तर : १.लालनपालन २.प्रहर ३.सार ४.यादवी ५.दर ६.वसाहत ८.कपबशी ९.कोयल १०.सनसनाटी १३.लट १६.कर्ण १८.वास १९.दीनवाणा २१.वदनी कवल घेता २२.वारू २४.दया २५.रकमपात २७.दास २८.दसरा ३१.परत ३३.रस ३५.साम दाम दंड भेद ३७.कमळ ३८.रास ३९.मनन ४०.कलाकार ४२.कस ४३.रजनीनाश ४४.आरडाओरड ४९.समता ५०.सराईत ५२.ताक ५३.लगेच ५५.खपली ५९.नवल ६१.नजरकैद ६३.रमारक्षा ६५.फराळ ६७.रवाळ ६८.कसब ६९.सामान ७४.तन ७५.वाट ७६.बाका ७७.पान

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महाराष्ट्र केसरी 2025-26’ कुस्ती स्पर्धेच्या बोधचिन्हाचे अनावरण

■ मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मानाच्या गदेचे पूजन

पुणे (दैनिक संध्या) : वर्षा या शासकीय निवासस्थानी ६८ व्या ‘महाराष्ट्र केसरी २०२५-२६’ कुस्ती स्पर्धेच्या अधिकृत बोधचिन्हाचे (लोगो) अनावरण व मानाच्या गदेचे पूजन राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या मान्यतेने रामकृष्ण सातव पाटील यांच्या वतीने या भव्य स्पर्धेचे आयोजन दिनांक १८ मार्च ते २२ मार्च २०२६ या कालावधीत वाघोली, पुणे याठिकाणी करण्यात आले आहे. यावेळी मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पर्धेच्या नियोजनाची सविस्तर माहिती घेत आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांच्या प्रयत्नांचे कौतुक केले व स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शुभेच्छा दिल्या. सदर स्पर्धेच्या समारोप समारंभाला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहण्याचे निमंत्रण आयोजक रामकृष्ण सातव पाटील यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना दिले असून त्यांनी ते स्वीकारले आहे. यंदाच्या महाराष्ट्र केसरी विजेत्याला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते मानाची गदा आणि फॉर्च्युनर गाडी देऊन गौरविण्यात येणार आहे. या कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे उपाध्यक्ष मा. मुरलीधरजी मोहोळ, महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाचे सरचिटणीस पै. योगेश दोडके, पुणे जिल्हा कुस्तीगीर संघाचे अध्यक्ष मेघराज कटके, नगरसेवक अनिल सातव पाटील तसेच कृष्णाजी बुचडे, नटराज सातव पाटील, सुनील (चाचा) जाधवराव, राहुल सातव, केतन जाधव, सागर सातव, महेश माने, मुकेश सातव, संदीप वारे, मयूर सातव आदी मान्यवर उपस्थित होते.


### मराठवाडा पर्यावरण बटालियनमध्ये माजी सैनिकांसाठी भरती मेळावा

पुणे (दैनिक संध्या) : मराठवाडा पर्यावरण बटालियन अंतर्गत १३६ इन्फंट्री बटालियन टीए इको, महार (एमओईएफ आणि सीसी) व महाराष्ट्र राज्य वन विभागातील माजी सैनिक तसेच माजी महिला कर्मचाऱ्यांसाठी भरती मेळावा आयोजित करण्यात आला आहे. हा भरती मेळावा दि. १६ ते २० मार्च २०२६ या कालावधीत क्षेत्रीय भर्ती कार्यालय, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) छावणी येथे होणार आहे. भरतीसाठी पात्र उमेदवारांनी दि. १६ मार्च २०२६ रोजी सकाळी ६.०० वाजता आवश्यक कागदपत्रांसह शारीरिक फिटनेस चाचणीसाठी उपस्थित राहावे. या भरती प्रक्रियेत सोल्जर जीडी – ४३ (निवासस्थान महाराष्ट्र राज्य), क्लर्क – ०६, हेअर ड्रेसर – ०९, मेस कीपर/स्टुअर्ड/हाऊस कीपर – ०१ (संपूर्ण भारत) अशी पदे भरण्यात येणार आहेत. माजी सैनिकांसाठी किमान वयोमर्यादा नाही; मात्र सेवानिवृत्ती अथवा डिस्चार्ज झाल्यानंतर पाच वर्षांच्या आत अर्ज केलेला असावा. तसेच एमओईएफ, सीसी व महाराष्ट्र राज्य वन विभागातील माजी महिला कर्मचाऱ्यांसाठीही (अकाली सेवानिवृत्तांसह) हीच अट लागू राहणार आहे. उमेदवारांनी पेन्शन पेमेंट ऑर्डर (PPO), डिस्चार्ज बुक, माजी सैनिक ओळखपत्र, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड व अलीकडील पासपोर्ट आकाराच्या आठ छायाचित्रांसह उपस्थित राहणे आवश्यक आहे. माजी सैनिक (OR) यांना ५० वर्षे वयापर्यंत सेवा करण्याची संधी उपलब्ध असल्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी पुणे तथा उपसंचालक (सैनिकीकरण) सैनिक कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य लेफ्टनंट कर्नल सतेश दैवानराव हंगे (नि.) यांनी केले आहे.

### गुढीपाडवा निमित्त आकर्षक वाहन नोंदणी क्रमांकांसाठी लिलाव प्रक्रिया जाहीर

पुणे (दैनिक संध्या) : गुढीपाडवा सणाच्या पार्श्वभूमीवर वाहन खरेदीचे प्रमाण वाढत असल्याने वाहनधारकांना आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक मिळावेत यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांच्या वतीने नवीन मालिका सुरू करण्यात येणार असून त्यासाठी आगाऊ अर्ज व लिलाव प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. खाजगी चारचाकी वाहनांसाठी पसंतीचे नोंदणी क्रमांक राखून ठेवण्यासाठी इच्छुकांनी दिनांक 13 मार्च 2026 रोजी सकाळी 10.30 ते दुपारी 2.30 या वेळेत विहित नमुन्यात अर्ज, डीडी, पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र व पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतींसह आरटीओ कार्यालयात सादर करावेत. एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज आल्यास लिलाव प्रक्रिया राबविण्यात येणार असून 16 मार्च 2026 रोजी दुपारी 4.00 वाजता लिलाव आयोजित करण्यात येईल. दुचाकी वाहनांसाठी आकर्षक क्रमांकाकरिता अर्ज 16 मार्च 2026 रोजी स्वीकारले जाणार असून त्याचा लिलाव 17 मार्च 2026 रोजी दुपारी 4.00 वाजता सहकार सभागृहात करण्यात येणार आहे. लिलावासाठी सादर करण्यात येणारा डीडी “R.T.O., Pune” या नावे नॅशनलाइज्ड किंवा शेड्युल्ड बँकेचा असावा व दोन महिन्यांपेक्षा जुना नसावा. अर्जासोबत पॅनकार्डची साक्षांकित प्रत जोडणे बंधनकारक आहे. एकाच क्रमांकासाठी एकच सीलबंद डीडी स्वीकारला जाईल. महाराष्ट्र मोटार वाहन नियम 1981 च्या नियम 54अ नुसार पसंतीचा नोंदणी क्रमांक 180 दिवसांपर्यंत वैध राहील. लिलावानंतर उर्वरित क्रमांकांसाठी प्रक्रिया https://fancy.parivahan.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात येणार असून इच्छुकांनी आधार संलग्नित मोबाईल क्रमांकाद्वारे नोंदणी करून पसंती क्रमांक आरक्षित करता येणार आहे. पुणे आरटीओ कार्यक्षेत्रातील पत्ता असलेल्या वाहनधारकांचेच अर्ज स्वीकारले जाणार असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांनी दिली आहे.

### जिल्हा माहिती कार्यालयातील रद्दी विक्रीबाबत आवाहन



पुणे (दैनिक संध्या) : जिल्हा माहिती कार्यालयातील मराठी, हिंदी व इंग्रजी दैनिके, साप्ताहिके व इतर किरकोळ जमा झालेली रद्दी विक्री करावयाची आहे. त्यासाठी स्थानिक विक्रेत्यांकडून दरपत्रके मागविण्यात येत आहेत. इच्छुक खरेदीदारांनी शॉप अ‍ॅक्ट परवान्यासहित आपली दरपत्रके दि. 23 मार्च 2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत बंद लिफाफ्यात जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, नवीन मध्यवर्ती इमारत, तळमजला, ससुन रुग्णालयासमोर, पुणे-01 येथे सुट्टीचे दिवस सोडून प्रत्यक्षपणे सादर करावीत. लिफाफ्यावर 'रद्दीसाठी दरपत्रके' असा उल्लेख असावा. मुदतीनंतर आलेल्या दरपत्रकांचा स्वीकार केला जाणार नाही, असे आवाहन जिल्हा माहिती अधिकारी, पुणे यांनी केलेलें आहे. दरपत्रके स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार हे कार्यालय राखून ठेवीत आहे.

#### विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या नागरिकांना ३१ मे अखेर

# मुलभूत ओळखपत्रे उपलब्ध करुन द्यावेत : जिल्हाधिकारी



**पुणे (दै. संध्या) :**

जिल्ह्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील नागरिकांना त्यांचे मुलभूत अधिकार व शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्याकरिता विविध ओळखपत्रे, प्रमाणपत्रे मोहिमस्तरावर ३१ मे २०२६ अखेर उपलब्ध करुन द्यावे, याकरिता सर्व संबंधित विभाग, विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी मिळून शिबीराचे आयोजन करावे, शिबीरामध्ये अधिकाधिक नागरिक उपस्थित राहतील, याद्दष्टीने नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिल्या. जिल्हाधिकारी कार्यालय येथे विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील लाभार्थ्यांना ओळखपत्रे, प्रमाणपत्रे व विविध योजनांचा लाभ देण्याबाबत गठीत जिल्हास्तरीय समितीच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम, शासकीय तसेच अशासकीय सदस्य, तहसीलदार श्वेता पवार, पिंपरी-चिंचवडचे तहसीलदार जयराज देशमुख, इतर मागास बहूजन कल्याण विभागाचे सहायक संचालक तथा समितीचे सचिव प्रदीप संकपाळ तर तहसीलदार दूरद्दष्यप्रणालीद्वारे उपस्थित होते.

श्री. डुडी म्हणाले, समाजातील शेवट्या घटकातील नागरिक विविध योजनेच्या लाभापासून वंचित राहू नयेत, त्यांना विविध योजनांचा लाभ देवून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आण्याकरिता जिल्हा प्रशासन प्रयत्नशील आहे.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबीर अभियानाअंतर्गत विमुक्त जाती व भटक्या जमाती संवर्गातील नागरिकांना आधार कार्ड, शिधापत्रिका, जात प्रमाणपत्र, उत्पन्न दाखला, नॉन क्रिमीलेयर, अधिवास दाखला, जन्म मृत्यू नोंदणी प्रमाणपत्र, विवाह नोंदणी प्रमाणपत्र अन्य आवश्यक प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्याकरिता विशेष शिबीरे आयोजित करावीत. या शिबीराच्या ठिकाणी संबंधित विभागाचे सक्षम अधिकाऱ्यांनी उपस्थित राहावे, तसेच याठिकाणी प्रमाणपत्राचे सर्वप्रकारचे नमुने उपलब्ध करुन द्यावे. शासन निर्णय, परिपत्रकांतील तरतूदीनुसार सर्व नागरिकांना ओळखपत्रे व प्रमाणपत्रे उपलब्ध करुन द्यावीत.

नागरिकांना विविध योजनांचा लाभ देतांना ओळखपत्रे व प्रमाणपत्राची आवश्यकता लागते. ही बाब विचारात घेता ओळखपत्र व प्रमाणपत्र मिळण्यास कागदपत्राअभावी एकही नागरिक वंचित राहणार नाही तसेच या बैठकीत समिती सदस्यांनी केलेल्या सूचनाही विचारात घेवून त्यानुसार कार्यवाही करावी, असेही श्री. डुडी म्हणाले. यावेळी अशासकीय सदस्यांनी बैठकीच्या अनुषंगाने सूचना करुन जिल्ह्यात शिबीराचे आयोजन, नागरिकांना ओळख व प्रमाणपत्रे मिळण्याच्या कामी सहकार्य करण्यात येईल, असे ते म्हणाले.


## महाबोधी महाविहार मुक्तीसाठी पुण्यात धरणे आंदोलन




**पुणे (दै. संध्या) :**

बिहारमधील गया येथे असलेल्या ऐतिहासिक "महाबोधी महाविहार"च्या व्यवस्थापनाचा अधिकार पूर्णपणे बौद्ध धम्मियांच्या ताब्यात देण्याच्या मागणीसाठी पुण्यात धरणे आंदोलन करण्यात आले. आज डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान (जिल्हाधिकारी कार्यालयासमोर) येथे पुणे परिसरातील भिक्खू संघाच्या वतीने हे आंदोलन पार पडले. या आंदोलनात भन्ते डॉ. नागघोष महाथेरो, भन्ते बुद्धघोष महाथेरो, भन्ते शाक्यपुत्र, भन्ते राजरत्न, शक्यपुत्र राहुल,धम्मरखीत, भन्ते पय्यारक्खीत,भन्ते धम्मानंद, भन्ते आनंद, भन्ते सचित बोधी, भन्ते मिलिंद, भन्ते प्रियदर्शी, भन्ते संघपाल, भन्ते यश, यांच्यासह भिक्खू संघाचे सदस्य उपस्थित होते. या प्रसंगी पुण्याचे उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते तथागत गौतम बुद्ध आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले, यावेळी माजी आमदार जयदेव गायकवाड , राहुल डंबाळे, नगरसेवक नंदिनी धेंडे , नगरसेवक निलेश आल्हाट , बाळासाहेब जानराव , वसंतराव साळवे , शैलेश चव्हाण , भागवानराव वैराट, महेंद्र कांबळे , रोहिदास गायकवाड , निलेश गायकवाड यांच्यासह हजारो नागरिकांनी सहभाग घेतला. या आंदोलनात भिक्खू संघासह बौद्ध समाजातील नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

आंदोलनकर्त्यांनी घोषणाबाजी करत *महाबोधी महाविहार*चे व्यवस्थापन बौद्ध अनुयायांच्या ताब्यात देण्याची मागणी केली. आंदोलनकर्त्यांनी सांगितले की, तथागत गौतम बुद्ध यांना ज्या ठिकाणी ज्ञानप्राप्ती झाली, त्या गया येथील महाबोधी महाविहाराची उभारणी प्राचीन काळात सम्राट अशोक यांनी केली होती. बौद्ध धर्मासाठी अत्यंत पवित्र असलेल्या या स्थळाचा हजारो वर्षांचा वारसा असूनही, सध्या त्याचे व्यवस्थापन बौद्धेतर व्यक्तींच्या ताब्यात असल्याचा मुद्दा आंदोलनकर्त्यांनी उपस्थित केला. महाबोधी महाविहार हा जागतिक बौद्ध वारशाचा केंद्रबिंदू असून त्याचे व्यवस्थापन पूर्णपणे बौद्ध समाजाच्या देखरेखीखाली असावे, अशी मागणी आंदोलनातून करण्यात आली. तसेच देशभरातील बौद्ध समाज या मागणीसाठी संघटित होत राष्ट्रव्यापी स्तरावर आंदोलन करत असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. या आंदोलनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न करण्यात आला असून, महाबोधी महाविहार मुक्तीसाठी पुढील काळातही संघर्ष सुरू ठेवण्याचा निर्धार आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केला.



### पोटनिवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध; एकूण मतदार ३ लाख ८३ हजार ७६७

**पुणे (दै. संध्या) :**

बारामती (२०१) विधानसभा मतदारसंघाच्या आगामी पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने १ जानेवारी २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचे विशेष संक्षिप्त पुनरीक्षण करून अंतिम मतदार यादी आज १० मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. या अंतिम यादीनुसार मतदारसंघातील एकूण मतदारांची संख्या ३ लाख ८३ हजार ७६७ इतकी झाली आहे. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांच्या दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या पत्रानुसार बारामती विधानसभा मतदारसंघासाठी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. त्यानुसार ९ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर ९ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात आल्या. प्राप्त अर्जांची छाननी करून आवश्यक ती दुरुस्ती केल्यानंतर अंतिम मतदार यादी १० मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे. अंतिम मतदार यादीत पुरुष मतदारांची संख्या १ लाख ९३ हजार ४९६, महिला मतदारांची संख्या १ लाख ९० हजार २७१, तर इतर मतदारांची संख्या २४ असून एकूण मतदारसंख्या ३ लाख ८३ हजार ७६७ इतकी आहे.

### उन्हाळ्याच्या सुट्टीत पुरेपूर मनोरंजन करणारा "पिक्चर बॉईज"

**पुणे (दै. संध्या) :**

चित्रपटात हिरो बनण्यासाठी धडपड करणाऱ्या तरुणांची गोष्ट आता 'पिक्चर बॉईज' या चित्रपटातून पाहता येणार आहे. उन्हाळ्याच्या सुट्टीत १५ मे पासून हा चित्रपट सर्वत्र प्रदर्शित होणार असून, प्रेक्षकांना कॉमेडीचा डोस मिळणार आहे. चित्रपटाचं दमदार पोस्टर नुकतेच सोशल मीडियावर लाँच करण्यात आलं आहे. त्रिमूर्ती फिल्म्सनं 'पिक्चर बॉईज' या चित्रपटाची निर्मिती केली आहे. रवी पांडुरंग पंडितपवार, राजा पांडुरंग पंडितपवार हे या चित्रपटाचे निर्माते असून शिवाजी केशव पाटील हे सहनिर्माते आहेत. चित्रपटाची कथा, पटकथा, संवादलेखन आणि दिग्दर्शन निलेशसिंग राजपूत यांनी केलं आहे. मंदार चोळकर, सुनील दोडगे, संध्या-प्रनिकेत यांनी लिहिलेल्या गीतांना वरुण लिखाते आणि संध्या-प्रनिकेत यांनी संगीतबद्ध केले आहे. सुप्रसिद्ध गायक आनंद शिंदे, जसराज जोशी, स्वप्नील गोडबोले, वरुण लिखाते, एल. के. लक्ष्मीकांत यांनी चित्रपटातली गाणी गायली आहेत.




■ प्रतीक लाड, हंसराज जगताप, अरबाज शेख, घनश्याम दरवडे (छोटा पुढारी) यांची मध्यवर्ती भूमिका

■'पिक्चर बॉईज' १५ मे पासून संपूर्ण महाराष्ट्रात

## विविधतेतील एकता हा भारताचा मानबिंदू : परशुराम वाडेकर

**पुणे (दै. संध्या) :**

भारत हा विविधतेने नटलेला देश असून विविधतेतील एकता हा भारताचा मानबिंदू आहे. तू झोपण्यासाठी सर्व समाज घटकांनी एकमेकांच्या सुखदुःखात सणसमारंभात सहभागी होऊन समाधानाने एकत्र राहावे, असे आवाहन उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी केले. विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समितीच्या वतीने महिला दिनी खास मुस्लिम महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या इफ्तार पार्टीच्या कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी उपमहापौर सुनीता वाडेकर, आरपीआयचे शिवाजीनगर मतदारसंघ अध्यक्ष अविनाश कदम, अ‍ॅड. ज्ञानेश्वर जाविर, शहाबुद्दीन काझी, सादिक शेख, मुजीब बुखारी, जुबेर पीरजादे, समीर मणियार, फारुख शेख, अली अब्बास कादरी, इब्राहिम सय्यद आदि उपस्थित होते. भारतात हिंदू, मुस्लिम,



**दरमहा केलेल्या कामांचा मांडणार लेखाजोखा**

मागासवर्गीय, आदिवासी अशा विविध धर्मपंथांचे लोक आनंदाने एकत्र राहतात. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान दर्जा दिलेला आहे. भारतीय समाज मानवता धर्म मानणारा, शांतता प्रिय. त्यामुळे सर्वांनी समाधानाने एकत्र राहणे अपेक्षित आहे, असे वाडेकर यांनी नमूद केले. प्रत्येकाला मृत्यू अटळ आहे. जोपर्यंत जीवन आहे तोपर्यंत सर्वांनी सद्भावनेने व सलोख्याने राहावे, असेही ते म्हणाले. रमजान हा पवित्र महिना मानला जातो. मात्र, या महिन्यात जगात निर्माण झालेली युद्ध परिस्थिती अत्यंत दुर्दैवी आहे. कोणत्याही प्रकारच्या हिंसाचाराचे समर्थन होऊच शकत नाही, असेही वाडेकर म्हणाले. मी आंबेडकरी चळवळीतून पुढे आलेला कार्यकर्ता आहे. समाजातील अपप्रवृत्तींशी संघर्ष करत आणि जनतेच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी लढे उभारत उपमहापौर पदापर्यंत पोहोचलो आहे. आपल्या पदाचा वापर करून शहरातील सर्व नागरिकांचे जीवन सुलभ आणि समाधानी करण्यासाठी प्रयत्न करणार आहे. अल्पसंख्याक समाजाच्या प्रगतीसाठी विशेष प्रयत्न करणार आहे, असेही वाडेकर यांनी स्पष्ट केली. प्रत्येक महिन्यात आपण केलेल्या कामाचा लेखाजोखा जनतेसमोर मांडणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले.

# बोपोडीत कॅन्सर निदान व HPV लसीकरण शिबिराचे उद्घाटन



**पुणे (दै. संध्या) :**

महिलांच्या आरोग्य संरक्षणाच्या दृष्टीने कॅन्सरचे लवकर निदान आणि सर्वायकल कॅन्सर प्रतिबंधासाठी महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून सोमवारी (दि. ९ मार्च २०२६) बोपोडी येथील कै. द्रौपदाबाई मुरलीधर खेडेकर प्रसूतीगृह व रुग्णालयात महिलांसाठी विशेष कॅन्सर निदान, सर्वायकल कॅन्सर प्रतिबंधात्मक (HPV) लसीकरण व समग्र आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी स्थानिक नगरसेवक सनी निम्हण, नगरसेविका सपना छाजेड, आरोग्य अधिकारी डॉ. नीना बोऱ्हाडे, परिमंडळ वैद्यकीय अधिकारी डॉ. दीपक पखाले, वैद्यकीय अधिकारी (WHO) डॉ. चेतन खाडे, लसीकरण वैद्यकीय अधिकारी डॉ. अरविंद मखर, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनील आंधळे, क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रेमलता घाटे, वैद्यकीय अधिकारी डॉ. गुणेश बागडे, रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी, शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षकवर्ग, आशा सेविका तसेच लाभार्थी महिला व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या प्रस्तावनेत आरोग्य अधिकारी डॉ. नीना बोऱ्हाडे यांनी सर्वायकल कॅन्सर प्रतिबंधासाठी HPV लसीकरणाचे वैद्यकीय आणि तांत्रिक महत्त्व सविस्तर स्पष्ट केले. समाजामध्ये पसरत असलेल्या गैरसमजुती दूर करून पालकांनी योग्य माहितीच्या आधारे आपल्या मुलींना HPV लसीकरण करून घेण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी बोलताना उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी सोशल मीडियावर पसरत असलेल्या अफवांवर विश्वास न ठेवता तज्ज्ञ डॉक्टरांकडून योग्य माहिती घेऊन मुलींना HPV लसीकरण करून घेण्याचे पालकांना आवाहन केले. महिलांच्या आरोग्य सुरक्षेसाठी पुणे महानगरपालिका आरोग्य सेवा अधिक सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच खेडेकर रुग्णालय व शेवाळे रुग्णालय येथे अधिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्याचे नियोजन सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

नव्याने उभारण्यात आलेल्या संजय गांधी इमारतीमध्ये महानगरपालिकेमार्फत मल्टीस्पेशालिटी रुग्णालयाच्या धर्तीवर विविध आरोग्य सुविधा विकसित करण्याचा मानस असल्याचेही त्यांनी नमूद केले. आवश्यकतेनुसार विविध संस्थांच्या CSR निधीच्या माध्यमातून आरोग्य सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले. या शिबिरामध्ये पात्र वयोगटातील किशोरवयीन मुलींसाठी HPV लसीकरण करण्यात आले, तसेच महिलांसाठी तोंड, स्तन आणि गर्भाशय मुख (Oral, Breast आणि Cervical) कॅन्सरचे प्राथमिक परीक्षण करण्यात आले. याशिवाय नाव नोंदणी, उंची-वजन व BMI मोजमाप, हिमोग्लोबिन तपासणी, रक्तातील साखर तपासणी (BSL-R), ABHA व PMJAY कार्ड नोंदणी तसेच रक्तक्षय व जीवनसत्वांची औषधे वितरण यासारख्या विविध आरोग्य सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### काऱ्हाटी येथे कराटे स्पर्धा उत्साहात

काऱ्हाटी (दैनिक संध्या) : काऱ्हाटी (ता. बारामती) येथील इंडियन तायकांदो कराटे किक बॉक्सिंग या संस्थेच्या वतीने आयोजित कराटे बेल्ट स्पर्धा उत्साहात पार पडली. विविध गटात झालेल्या या स्पर्धेला चार तालुक्यांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. ग्रँड मास्टर सुनील खताळ यांचे मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा घेण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार अशोक वेदपाठक, प्रमुख पाहुणे म्हणून बाळासाहेब वाबळे, ग्रामसेवक दिपाली लोणकर, सुरेखा जाधव आदी उपस्थित होते. स्पर्धेतील बेल्ट श्रेणीनुसार यशस्वी विद्यार्थी येलो बेल्ट (लहान गट) मुलीः ज्ञानेश्वरी भिसे, आदिती लोणकर, अस्मिता लोणकर. मुलेः आदित्य गुरव, वेदांत भिसे, अमन सहानी. मध्यम गट- कराटे स्पर्धेत विशेष प्राविण्य प्राप्त विद्यार्थ्यांना सन्मानित करताना मान्यवर. मुलेः रितेश पाटील, शिवराज माने, महेंद्र चौधरी. मोठा गट- मुली सिद्धी खोमणे, सांस्कृती खोमणे, श्रद्धा काकडे. मोठा गट-मुलेः जीवन कांबळे, सार्थक जगताप, साहिल खोमणे. ऑरेंज बेल्ट (लहान गट) मुलीः राजनंदिनी लकडे, अक्षदा गडदरे, काव्या तांबे. मध्यम गट-मुलेः साई भिसे, शिवम लकडे. मध्यम गट-मुलीः सान्वी गडदरे, प्रांजल लकडे, तन्वी मदने. ग्रीन बेल्ट (मध्यम गट) मुलीः स्वरांजली गडदरे, कार्तिकी तांबे, तेजस्वी वाबळे. मध्यम गट- मुलेः आर्यन अडागळे, मयूर गडदरे, वेदांत क्षीरसागर. ब्ल्यू बेल्ट : अथर्व खोमणे. पर्पल बेल्ट मुलीः प्रियंका आंबेकर, समीक्षा खैरे, स्वरा पवार. मुलेः आर्यन खैरे, सुरेश शेळके, सिद्धेश खोमणे. ब्राऊन बेल्ट : सानिका खरात.

### पुणे महानगरपालिकेच्या वतीने, पुणे जिल्हा चेस सर्कलच्या सहकार्याने आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : पुणे महानगरपालिकेच्या वतीने पुणे महापौर चषक बुद्धिबळ स्पर्धेला आज, गुरुवारपासून सुरुवात होणार आहे. पुणे जिल्हा चेस सर्कलच्या सहकार्याने होणारी ही स्पर्धा १२ ते १४ मार्चदरम्यान लॉ कॉलेज रोडवरील भांडारकर इन्स्टिट्यूटमध्ये होणार आहे, अशी माहिती संयोजक सचिव आणि नगरसेवक सुनील पांडे लोहगावकर यांनी दिली. या स्पर्धेत एकूण सहा लाख २१ हजार रुपयांची पारितोषिक देण्यात आली आहेत. ही स्पर्धा ७, ९, ११, १३, १५, १७, १९ वर्षांखालील गट आणि खुल्या गटात होणार आहे. स्पर्धेत पुणे जिल्ह्यातील सर्वांना मोफत प्रवेश असणार आहे. प्रत्येक गटातील विजेत्यास ११ हजार रुपयांचे पारितोषिक असणार आहे. स्पर्धेचे उद्घाटन आज, गुरुवारी महापौर मंजुषा नागपुरे यांच्या हस्ते होणार आहे. या वेळी सुनील पांडे लोहगावकर, स्पर्धा संचालक राजेंद्र कोंडे, चिफ आरबिटर राजेंद्र शिदोरे, पवन राठी, पवन कातकडे आदी उपस्थित राहणार आहेत. अधिक माहितीसाठी राजेंद्र शिदोरे (९८९०४८५६६६) या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### छत्रपती संभाजी महाराजांच्या बलिदान दिनानिमित्त काँग्रेस भवनात अभिवादन

पुणे (दैनिक संध्या) : पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज यांच्या बलिदान दिनानिमित्त काँग्रेस भवन येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या वेळी पुणे शहर काँग्रेसचे अध्यक्ष अरविंद शिंदे यांनी संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहिली. यावेळी उपाध्यक्ष अजित दरेकर, प्राची दुधाणे, राज अंबिके, मुन्ना खंडेलवाल, राजेश मोहिते, खुशाल चव्हाण, नितीन वायदंडे, रोहित घोडके, आकाश ढवळे, पोपट पाटोळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. उपस्थितांनी छत्रपती संभाजी महाराजांच्या शौर्य, त्याग आणि धर्मरक्षणासाठी दिलेल्या बलिदानाची आठवण करून त्यांना अभिवादन केले.

### विकसित महाराष्ट्राचा रोडमॅप असलेला अर्थसंकल्प; आ. शेखर निकम यांचा विश्वास




मुंबई (दैनिक संध्या) : राज्याच्या अर्थसंकल्पावरील चर्चेत सहभागी होताना आमदार शेखर निकम यांनी सुरुवातीला दिवंगत अजितदादा यांना विनम्र अभिवादन करत त्यांच्या आठवणी जाग्या केल्या. महाराष्ट्राला पाच ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेकडे नेण्याचे जे स्वप्न राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखवले आहे, त्याचे प्रतिबिंब या अर्थसंकल्पात स्पष्टपणे दिसून येत असल्याचे सांगत त्यांनी या अर्थसंकल्पाला ठाम पाठिंबा दिला. हा अर्थसंकल्प केवळ आकड्यांचा खेळ नसून विकसित महाराष्ट्राचा रोडमॅप असल्याचे सांगत पायाभूत सुविधा, शेती, उद्योग आणि महिला सक्षमीकरण या चार स्तंभांवर उभा असलेला हा अर्थसंकल्प राज्याला नव्या दिशेने नेणारा असल्याचे निकम यांनी नमूद केले. कसबा संगमेश्वर येथे उभारण्यात येणाऱ्या छत्रपती संभाजी महाराज Memorial स्मारकासाठी अर्थसंकल्पात निधीची तरतूद केल्याबद्दल त्यांनी मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे आभार मानले. तसेच सिंधुदुर्ग-रत्नागिरीसाठी महत्त्वाची असलेली ‘सिंधुरत्न योजना ’ पुन्हा सुरू केल्याबद्दलही सरकारचे अभिनंदन केले. शेतकरी कर्जमाफी योजनेबाबत बोलताना कोकणातील शेतीची वैशिष्ट्ये लक्षात घेऊन फळबाग कर्जाचा समावेश करण्याची मागणी त्यांनी केली. कोकणातील शेती प्रामुख्याने हापूस आंबा, काजू, नारळ, सुपारी आणि कोकम यांसारख्या फळबागांवर आधारित असल्याने त्या पिकांसाठी घेतलेल्या कर्जालाही कर्जमाफीचा लाभ मिळावा, अशी भूमिका त्यांनी मांडली. तसेच दोन लाखांहून अधिक कर्ज घेतलेल्या आंबा-काजू बागायतदारांना अधिक अनुदान देण्याची मागणीही त्यांनी केली. कोकणातील हवामान बदलामुळे आंबा-काजू पिकांचे मोठे नुकसान होत असल्याने फळबागांसाठी विशेष पॅकेज जाहीर करण्याची गरज त्यांनी अधोरेखित केली. याबाबत राज्याचे फलोत्पादन मंत्री यांनी सकारात्मक भूमिका घेतल्याचेही त्यांनी नमूद केले. पायाभूत सुविधांच्या संदर्भात बोलताना मुंबई –गोवा हायवे यंदाच्या वर्षात पूर्ण होण्याची अपेक्षा व्यक्त करत यामुळे कोकणातील प्रवास आणि पर्यटनाला मोठी चालना मिळेल, असे त्यांनी सांगितले. तसेच जलवाहतूक टर्मिनल्स उभारल्यास मुंबई-कोकण प्रवासाचा कालावधी कमी होऊन पर्यटन उद्योगाला गती मिळेल, असेही त्यांनी नमूद केले. पर्यटन विकासासाठी गणपतीपुळे टेम्पल, तारकर्ली बीच, मार्लेश्वर टेम्पल, हरिहरेश्वर यांसारख्या ठिकाणांसह इतर धार्मिक-पर्यटन स्थळांचा नाविन्यपूर्ण विकास करण्याची मागणीही त्यांनी केली.

# ‘पीआयबीएम’ तर्फे आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन

**पुणे (दै. संध्या) :**

पुणे इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेंट (पीआयबीएम) तर्फे “एज्युकेशन टू एम्प्लॉयमेंट - बिल्डिंग फ्युचर-रेडी युथ इन ब्रिक्स अँड अदर पार्टनर कंट्रीज ” या विषयावर आंतरराष्ट्रीय परिषद २०२६ चे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत धोरणकर्ते, अधिकारी, प्राध्यापक आणि विद्यार्थी एकत्र आले आणि भविष्यातील नोकऱ्यांसाठी तरुणांना कसे तयार करायचे यावर चर्चा केली.



या परिषदेत शिक्षण आणि नोकरी यांच्यातील अंतर कमी करण्याची गरज अधोरेखित करण्यात आली. त्यासाठी कौशल्य विकास, तंत्रज्ञानाची माहिती आणि देशांमधील सहकार्य किती महत्त्वाचे आहे यावर चर्चा करण्यात आली. आशिया, आफ्रिका, युरोप आणि लॅटिन अमेरिका सह अनेक देशांचे प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी झाले.

कार्यक्रमात बोलताना डॉ. विनोदकुमार गायकवाड, प्रादेशिक पासपोर्ट अधिकारी, पुणे यांनी सांगितले की, आज भारताकडे जगातील सर्वाधिक तरुणांची ताकद आहे. योग्य शिक्षण, प्रशिक्षण आणि संधी मिळाल्यास हे तरुण केवळ भारतासाठीच नाही तर संपूर्ण जगाच्या विकासात मोठे योगदान देऊ शकतात.

डॉ. गायकवाड म्हणाले की पंतप्रधानांनीही कौशल्य विकासाला खूप महत्त्व दिले आहे. कारण कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) सारखे नवीन तंत्रज्ञान वेगाने वाढत आहे आणि त्यामुळे अनेक उद्योग काळानुरुप बदलत आहेत. त्यामुळे शिक्षणात नवकल्पना, तंत्रज्ञानाची समज, उद्योजकता आणि काळानुरुप बदलांना जुळवून घेण्याची क्षमता यावर अधिक भर दिला पाहिजे.

पुण्याबद्दल बोलताना डॉ. गायकवाड म्हणाले की पुणे हे जागतिक पातळीवरील शिक्षणाचे केंद्र आहे. येथे भारतातील आणि इतर देशांतील विद्यार्थी शिक्षण घेतात. यामुळे ज्ञानाची देवाणघेवाण होते, कौशल्य वाढते आणि देशांमधील मैत्रीही मजबूत होते. "आजच्या जगात विद्यार्थ्यांना जागतिक अनुभव मिळणे खूप महत्त्वाचे आहे. माझ्या कामात मला अनेकदा दिसते की शिक्षणामुळे तरुणांना जगाशी जोडले जाते. पासपोर्ट हा फक्त परदेशी प्रवासाचा कागद नसून त्याद्वारे शिक्षण, नवनिर्मिती आणि करिअरच्या नव्या संधींचे दार उघडते,” असेही ते म्हणाले.

पीआयबीएम समूहाचे अध्यक्ष रमणप्रीत यांनी आपल्या भाषणात विविध देशांतील राजदूत, अधिकारी आणि तज्ज्ञांचे स्वागत केले. ते म्हणाले, “या परिषदेमागचा उद्देश खूप सोपा आहे. आम्ही केलेल्या संशोधनातून आम्हाला कळले की जगासमोर एक मोठे आव्हान आहे - तरुणांमध्ये योग्य कौशल्ये विकसित करणे.”

त्यांनी सांगितले की अनेक विकसनशील देशांमध्ये लघु आणि मध्यम उद्योग (एसएमई) अर्थव्यवस्थेत मोठे योगदान देतात. हे उद्योग साधारण ३० ते ४० टक्के जीडीपी तयार करतात. विकसित देशांमध्ये हे योगदान ५० ते ५५ टक्क्यांपेक्षा जास्त असते. या फरकाचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे कामगारांचे कौशल्य प्रशिक्षण. विकसित देशांमध्ये लोकांना पुढील ५ ते १० वर्षांच्या गरजांसाठी आधीच प्रशिक्षण दिले जाते.

या परिषदेत रमणप्रीत यांनी आंतरराष्ट्रीय सहकार्याने ‘बिझनेस सेंटर ऑफ एक्सलन्स’ तयार करण्याचा प्रस्ताव मांडला. ही केंद्रे वेगवेगळ्या उद्योगांवर लक्ष केंद्रित करतील आणि नवीन कल्पना, उत्तम व्यवसाय पद्धती आणि आधुनिक उपाय विकसित करण्यास मदत करतील. ते म्हणाले, “प्रत्येक देशाची काही खास ताकद असते. काही देश उत्पादनात पुढे असतात, तर काही तंत्रज्ञानात किंवा सेवांमध्ये.” देशांनी एकत्र काम केले तर ते नवीन तंत्रज्ञान, प्रक्रिया आणि व्यवसाय मॉडेल्ससह एकत्रित काम करू शकतात. यामुळे लघु आणि मध्यम उद्योगांनाही आधुनिक तंत्रज्ञान वापरणे सोपे होईल.

## टाटा मोटर्स आणि महाराष्ट्र ग्रामीण बँकेमध्ये सामंजस्य करार

**मुंबई (दै. संध्या) :**

भारताची आघाडीची व्यावसायिक वाहन उत्पादक कंपनी टाटा मोटर्सने आपल्या व्यावसायिक वाहनांसाठी वित्तपुरवठा सेवा अधिक मजबूत करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र ग्रामीण बँक (एमजीबी) सोबत सामंजस्य करार (एमओयू) केला आहे. या कराराचा मुख्य भर टाटा मोटर्सच्या स्मॉल कमर्शियल व्हेईकल्स आणि पिक-अप्स (एससीव्हीपीयू) श्रेणीवर, विशेषतः एस प्रो सारख्या वाहनांवर राहणार आहे.

या सहयोगामुळे ग्राहकांना वाहन खरेदी करणे अधिक सोपे होणार असून कमी व्याजदर, सोपी कागदपत्र प्रक्रिया आणि त्वरित कर्ज वितरण यांसारख्या सुविधा उपलब्ध होतील. महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या ७४८ शाखांच्या विस्तृत नेटवर्कमुळे उद्योजक, ट्रान्सपोर्टर्स आणि पहिल्यांदाच वाहन खरेदी करणाऱ्या ग्राहकांना किफायतशीर ईएमआयवर वाहन खरेदी करता येणार आहे. त्यामुळे त्यांना स्वतःचा व्यवसाय सुरू करून तो विकसित करण्यास मदत होईल.

महाराष्ट्रातील पर्यटन, कृषी आणि फलोत्पादन क्षेत्रांना सेवा देत टाटा मोटर्सची स्मॉल कमर्शियल व्हेईकल्स व पिक-अप्स श्रेणी राज्याच्या अर्थव्यवस्थेला दीर्घकाळापासून हातभार लावत आहे. ही वाहने विविध प्रदेशांतील गरजांनुसार मालवाहतूक सुलभ करतात आणि ग्रामीण-शहरी भागांमधील व्यवसायांना चालना देतात.

या सहयोगाबाबत टाटा मोटर्स कमर्शियल व्हेईकल्सच्या एससीव्हीपीयू विभागाचे उपाध्यक्ष व व्यवसाय प्रमुख पिनाकी हेल्डर म्हणाले, “उद्योजकतेला चालना देणे आणि विश्वासार्ह, किफायतशीर गतिशीलता उपाय उपलब्ध करून देणे ही आमची बांधिलकी आहे. महाराष्ट्र ग्रामीण बँकेसोबतचा हा करार आमच्या वाहनांना सुलभ वित्तपुरवठा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे पहिल्यांदाच वाहन खरेदी करणारे ग्राहक, ट्रान्सपोर्टर्स आणि लघुउद्योजक आत्मविश्वासाने आपला व्यवसाय सुरू करू शकतील.”

## ऑल-न्यू ह्युंदाई वेन्यूने १ लाख बुकिंग्जचा टप्पा पार केला

### एचएमआयएलकडून नवीन एचएक्स8 डिझेल एटी व्हेरिएण्ट लाँच, किंमत 13,69,900 रूपये

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेड (एचएमआयएल)ने आज त्यांची गतीशील व ट्रेण्डसेटिंग कॉम्पॅक्ट एसयूव्ही ऑल-न्यू ह्युंदाई वेन्यूसाठी 1 लाख बुकिंग्जचा टप्पा पार करण्याची घोषणा केली. या महत्त्वपूर्ण टप्प्याला साजरे करत आणि कॉम्पॅक्ट एसयूव्ही श्रेणीमधील आपले स्थान अधिक प्रबळ करत कंपनीने नवीन एचएक्स8 डिझेल ऑटोमॅटिक (एटी) व्हेरिएण्टच्या लाँचची देखील घोषणा केली, ज्यामध्ये भारतातील आधुनिक ग्राहकांसाठी अधिक सोयीसुविधा व कार्यक्षमता आहे. नवीन एचएक्स8 डिझेल एटी व्हेरिएण्टच्या लाँचसह प्रभावी गतीशीलतेसह शक्तिशाली कार्यक्षमतेचा शोध घेत असलेल्या ग्राहकांसाठी ह्युंदाई वेन्यूची उपलब्धता अधिक वाढली आहे. नवीन व्हेरिएण्टमध्ये प्रमाणित यू2 1.5 लिटर सीआरडीआय डिझेल इंजिनची शक्ती आहे, ज्यासोबत 6-स्पीड ऑटोमॅटिक ट्रान्समिशन आहे, ज्यामधून प्रगत तंत्रज्ञान, अधिक आरामदायीपणा आणि सुधारित कार्यक्षमता मिळते. यासह अत्याधुनिक व आरामदायी ड्रायव्हिंग अनुभवाचा शोध घेत असलेल्या ग्राहकांसाठी ह्युंदाई वेन्यूचा अपील अधिक प्रबळ झाला आहे.

नवीन एचएक्स8 डिझेल एटी व्हेरिएण्टमध्ये आरामदायीपणा, सुरक्षितता व सोयीसुविधा वैशिष्ट्यांची अपग्रेडेड श्रेणी आहे, जसे:

- फ्रण्ट रो व्हेण्टिलेटेड सीट्स
- ड्युअल टोन लेदरेट सीट्सह वेन्यू ब्रँडिंग
- इलेक्ट्रिक 4-वे ड्रायव्हर सीट अॅडजस्ट
- कंट्रोलर ओव्हर-द-एअर (ओटीए) वेईकल अपडेट्स
- ह्युंदाई ब्लूलिंक (कनेक्टेड कार तंत्रज्ञान)
- इलेक्ट्रिक पार्किंग ब्रेकसह ऑटो होल्ड
- रिअर डिस्क ब्रेक्स
- अॅम्बियण्ट लायटिंग - क्रॅश पॅड व सेंट्रल कन्सोल
- ड्राइव्ह मोड सिलेक्ट्स (इको, नॉर्मल, स्पोर्ट)
- ट्रॅक्शन कंट्रोल मोड्स (सँड, मड, स्नो)
- पॅडल शिफ्टर्स

1 लाख बुकिंग्जचा टप्पा पार करण्याबाबत, तसेच नवीन एचएक्स8 डिझेल एटी व्हेरिएण्टच्या लाँचबाबत मत व्यक्त करत ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेडचे मॅनेजिंग डायरेक्टर व सीईओ श्री. तरूण गर्ग म्हणाले, आम्हाला आनंद होत आहे की, नवीन ह्युंदाई वेन्यूने 1 लाख बुकिंग्जचा टप्पा पार केला आहे, ज्यामधून भारतातील ग्राहकांनी आमच्या ब्रँडवर दाखवलेला प्रबळ विश्वास दिसून येतो.

तसेच, या महत्त्वपूर्ण टप्प्यामधून दैनंदिन ड्रायव्हिंगला अधिक उत्साहवर्धक करणाऱ्या स्मार्ट, कनेक्टेड व वैशिष्ट्य-संपन्न गतीशीलता सोल्यूशन्ससाठी वाढती महत्त्वाकांक्षा देखील निदर्शनास येते. लाँच करण्यात आलेले नवीन एचएक्स8 डिझेल ऑटोमॅटिक व्हेरिएण्ट वेन्यू लाइनअपला अधिक दृढ करते, तसेच ग्राहकांना डिझेल कार्यक्षमता, टॉर्क-संपन्न कार्यक्षमता आणि प्रभावी सोयीसुविधेचे परिपूर्ण संयोजन देते.

यामधून प्रगत तंत्रज्ञान व उच्च दर्जाचे मूल्य यांचे पाठबळ असलेले अर्थपूर्ण पर्याय प्रदान करण्याप्रती आमची कटिबद्धता दिसून येते. ह्युंदाईमध्ये आम्ही भविष्यासाठी सुसज्ज उत्पादने वितरित करण्यावर लक्ष केंद्रित केले आहे, जे ग्राहकांच्या सर्वसमावेशक अपेक्षांची पूर्तता करतील आणि भारतातील गतीशीलतेच्या भावी टप्प्याला चालना देतील.

देशातील ह्युंदाईच्या व्यापक विक्री व सेवा नेटवर्कचे पाठबळ असलेली ह्युंदाई वेन्यू वैशिष्ट्य-संपन्न, आरामदायी व भविष्यासाठी सुसज्ज कॉम्पॅक्ट एसयूव्हीचा शोध घेत असलेल्या ग्राहकांकरिता लक्षवेधक तत्त्व आहे. हयुंदाई मोटर इंडिया लिमिटेड ग्राहकांना प्रगत तंत्रज्ञान, सुरक्षितता, आरामदायीपणा व मूल्याचे लक्षवेधक संयोजन देण्याप्रती, तसेच ग्राहकांच्या सर्वसमावेशक पसंतींची पूर्तता करण्यासाठी आपल्या उत्पादन पोर्टफोलिओमध्ये सतत नाविन्यता आणण्याप्रती कटिबद्ध आहे.

## समर्थ ई-मोबिलिटीकडून फुल-स्टॅक ईव्ही टेक्नॉलॉजी प्लॅटफॉर्मचे अनावरण

**अहमदाबाद (दै. संध्या) :**

भारताच्या इलेक्ट्रिक मोबिलिटी क्षेत्रात महत्त्वाचा टप्पा गाठत समर्थ ई-मोबिलिटी प्रा. लि. या तंत्रज्ञान-केंद्रित कंपनीने भारतात डिझाइन आणि विकसित केलेला १०० टक्के स्वदेशी फुल-स्टॅक इलेक्ट्रिक व्हेईकल (EV) टेक्नॉलॉजी प्लॅटफॉर्म सादर केला आहे. हा प्लॅटफॉर्म कंपनीच्या आगामी इलेक्ट्रिक मोटरसायकलला ऊर्जा देणार आहे.



‘मेक इन इंडिया’च्या दृष्टीकोनातून पूर्णपणे भारतात विकसित करण्यात आलेल्या या प्लॅटफॉर्ममध्ये ईव्हीमधील महत्त्वाचे घटक समाविष्ट आहेत. यात बॅटरी पॅक, बॅटरी मॅनेजमेंट सिस्टम (BMS), मोटर, मोटर कंट्रोलर, पॉवर कंट्रोल मॉड्यूल, डीसी-डीसी कन्व्हर्टर, एआय-नियंत्रित ऑनबोर्ड फास्ट चार्जर, इन्स्ट्रुमेंट क्लस्टर आणि कंपनीची स्वतःची ऑपरेटिंग सिस्टम यांचा समावेश आहे. कंपनीच्या बॅटरी पॅकची नेट्रॅक्सद्वारे विक्रमी वेळेत चाचणी व होमोलोगेशन करण्यात आले असून, कंपनीने इन-हाऊस विकसित केलेल्या बीएमएसचे परीक्षण व प्रमाणीकरण आयसीएटीद्वारे यशस्वीरित्या पूर्ण झाले आहे. या स्वदेशी प्लॅटफॉर्ममुळे ईव्ही क्षेत्रात आयातीवरील अवलंबित्व कमी करण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले गेले आहे.

समर्थ ई-मोबिलिटीने गेल्या तीन वर्षांपासून गुजरातमधील कालोल येथील आरअँडडी केंद्रात या तंत्रज्ञानाचा विकास केला आहे. सखोल अभियांत्रिकी, व्यापक चाचण्या आणि सतत प्रमाणीकरण यांच्या माध्यमातून हार्डवेअर-सॉफ्टवेअर एकत्रीकरण अधिक सक्षम करण्यात आले असून भारतीय रस्ते आणि हवामान परिस्थिती लक्षात घेऊन ही प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

या प्रसंगी कंपनीचे सह-संस्थापक प्रियंक राखोलिया म्हणाले, “भारताच्या ईव्ही परिवर्तनासाठी केवळ असेंब्ली-आधारित उपाय पुरेसे नाहीत. स्वदेशी अभियांत्रिकी, नावीन्य आणि भारतीय राइडर्ससाठी खास तयार केलेली उत्पादने आवश्यक आहेत. त्यामुळे आम्ही बॅटरी सिस्टमपासून मोटर आणि पॉवर इलेक्ट्रॉनिक्सपर्यंत संपूर्ण तंत्रज्ञान इन-हाऊस विकसित केले आहे. लवकरच आम्ही प्रीमियम इलेक्ट्रिक मोटरसायकल श्रेणीत प्रवेश करणार आहोत.”

कंपनीचे तंत्रज्ञान ५१ हजार किमीपेक्षा जास्त प्रत्यक्ष रस्ते चाचणी, ३,४०० किमीपेक्षा जास्त टॉर्चर टेस्टिंग आणि विविध डायनॅमोमीटर चाचण्यांतून सिद्ध झाले आहे. १०० हून अधिक अभियंत्यांची टीम या प्रकल्पावर काम करत असून रेअर-अर्थ-फ्री मोटर टेक्नॉलॉजी आणि स्वतःची बॅटरी मॅनेजमेंट प्रणाली विकसित करण्यात आली आहे.

गुजरातच्या छत्राल येथे १.५ लाख चौरस फूटांहून अधिक क्षेत्रफळावर कंपनीचा उत्पादन प्रकल्प उभारण्यात आला आहे. या प्रकल्पाची क्षमता दरमहा ४५ हजारांहून अधिक इलेक्ट्रिक दुचाकी आणि वर्षाला ५ लाखांपेक्षा अधिक युनिट्स उत्पादन करण्याची आहे.

प्रबळ आरअँडडी पायाभूत सुविधा, स्वदेशी तंत्रज्ञान आणि उच्च कार्यक्षमतेवर भर देत समर्थ ई-मोबिलिटी भारतातील वेगाने वाढणाऱ्या इलेक्ट्रिक दुचाकी बाजारपेठेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावण्यास सज्ज असून यावर्षी कंपनीचा पहिला ब्रँड आणि इलेक्ट्रिक मोटरसायकल सादर करण्याची योजना आहे.

## ‘तारिणी’ उपक्रमांतर्गत पॉश कायद्याबाबत मोफत मार्गदर्शन कार्यक्रम

**पुणे (दै. संध्या) :**

ओपश सोशिओ कमर्शिअल प्रा. लि. या पुणेस्थित कंपनीने ८ मार्च २०२० रोजी ‘तारिणी’ नावाने उपक्रमाची सुरुवात केली. या उपक्रमांतर्गत कार्यालयीन ठिकाणी महिलांच्या लैंगिक शोषणाविरुद्ध कुठे व कशाप्रकारे तक्रार करावी, याबाबत मार्गदर्शन केले जाते तसेच महिलांना त्यांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांची माहिती दिली जाते. तारिणी या हेल्पलाईन मार्फत गेल्या ५ वर्षात १५०० हुन अधिक उपभोगतांना मार्गदर्शन केले आहे.यावर सर्वसाधारणपणे ८०% कॉल हे पॉश निगडित तक्रारींसाठी असून,२०% इतर काही तक्रारींकरिता नोंदवले गेले आहेत. यंदाच्या जागतिक महिला दिनानिमित्त २ मार्च ते ७ मार्च २०२६ या कालावधीत ‘तारिणी’ उपक्रमांतर्गत समाजातील विविध घटकांतील महिलांसाठी पॉश (कार्यस्थळी महिलांवरील लैंगिक छळ प्रतिबंध व निवारण) कायद्याबाबत मोफत मार्गदर्शनपर सत्रांचे आयोजन करण्यात आले. ही सत्र पुण्यातील विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या आठ संस्थांमध्ये घेण्यात आली. अमेय जोशी, अदिती देशपांडे व राधिका कुलकर्णी या ओपशच्या टीम मधील तिघांनी सदर सत्रांद्वारे मार्गदर्शन केले. या उपक्रमात गुडविल इंडिया ही स्वयंसेवी संस्था, म्हाळसाकांत विद्यालय, आकुर्डी, एस. टी. महामंडळ, अंगणवाडी, बचत गट आणि घरकाम करणाऱ्या कर्वे नगर वस्तीमधील महिला, जनता सहकारी बँक, पंचायत समिती राजगुरूनगर, वंचित विकास संस्था तसेच पुणे महानगरपालिका अंतर्गत कार्यरत स्वच्छ या संस्थांचा समावेश होता.

# एम. पी. अहमद यांना ‘महाराष्ट्रीयन ऑफ द इयर २०२६’ मधील बिझनेस भूषण पुरस्कार

**मुंबई (दै. संध्या) :**

मालाबार ग्रुपचे अध्यक्ष एम. पी. अहमद यांना लोकमत महाराष्ट्रीयन ऑफ द इयर अवॉर्ड २०२६ सोहळ्यात प्रतिष्ठेचा बिझनेस भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. दागिने व्यवसाय क्षेत्रातील दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व आणि जागतिक स्तरावर उद्योग उभारण्यात दिलेल्या योगदानाबद्दल त्यांना हा सन्मान देण्यात आला. मुंबईतील ऐतिहासिक गेटवे ऑफ इंडिया येथे हा भव्य पुरस्कार सोहळा पार पडला. या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, लोकमत समूहाचे अध्यक्ष विजय दर्डा तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवर, उद्योगपती, प्रशासकीय अधिकारी आणि मनोरंजन क्षेत्रातील व्यक्ती उपस्थित होत्या. लोकमत मीडिया समूहाकडून दिल्या जाणाऱ्या या पुरस्कारांद्वारे विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा गौरव केला जातो. एम. पी. अहमद यांनी मालाबार गोल्ड अँड डायमंड्स या ब्रँडला जागतिक स्तरावर उभे करत भारतीय मूळ असलेला सर्वात मोठा ज्वेलरी रिटेलर आणि जगातील पाचव्या क्रमांकाचा ज्वेलरी रिटेलर बनवण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.




पुरस्कार स्वीकारताना एम. पी. अहमद म्हणाले की, “हा सन्मान मालाबार परिवाराच्या सामूहिक प्रयत्नांचे आणि ग्राहकांनी आमच्यावर ठेवलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे. जबाबदारी, प्रामाणिकपणा आणि समाजासाठी मूल्य निर्माण करण्याच्या ध्येयाने आम्ही कार्य करत राहू.”

१९९३ मध्ये स्थापन झालेल्या मालाबार गोल्ड अँड डायमंड्सने पारदर्शक आणि जबाबदार ज्वेलरी रिटेल क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. आज कंपनीचे १४ देशांमध्ये ४२५ हून अधिक शोरूम्स असून ती जागतिक स्तरावर भारतीय हस्तकलेचा ठसा उमटवत आहे. महाराष्ट्र हा मालाबार गोल्ड अँड डायमंड्ससाठी महत्त्वाचा बाजार असून राज्यातील विविध शहरांमध्ये कंपनीची ३४ शोरूम्स कार्यरत आहेत. आगामी काळात २०२९ पर्यंत महाराष्ट्रात ६४ शोरूम्स सुरू करण्याचे कंपनीचे लक्ष्य आहे.

व्यवसायाबरोबरच सामाजिक बांधिलकी जपत मालाबार ग्रुप शिक्षण, आरोग्य, निवास, भूक निर्मूलन आणि महिला सक्षमीकरणासाठी सातत्याने कार्य करत आहे. कंपनी आपल्या नफ्याच्या ५ टक्के रक्कम सामाजिक उपक्रमांसाठी खर्च करते.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक संघ उपविजेता

पिंपरी, पुणे (दैनिक संध्या) : आंतर पदविका अभियांत्रिकी विद्यार्थी क्रीडा संघटनेच्या वतीने संजीवनी के. बी. पी. पॉलिटेक्निक कोपरगाव जिल्हा अहिल्यानगर येथे आयोजीत केलेल्या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक मुलांच्या संघाने उपविजेतेपद पटकावले. या राज्यस्तरीय बास्केटबॉल स्पर्धेत एकूण आठ संघांनी सहभाग घेतला होता. यापैकी अंतिम सामन्यात अहिल्यानगर येथील नेप्ती पॉलिटेक्निकच्या संघाने १९ गोल केले तर पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निकच्या (पीसीपी) संघाने १० केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) पिंपरी चिंचवड पॉलिटेक्निक उपविजेत्या मुलांच्या फुटबॉल संघात अनिकेत खोसे, राजवीर आखाडे, रवीतेज यादव, सागर माळगी, यश नगरे, हर्ष गंगावणे, सर्वेश धनावडे, परीक्षित पोवार, जय क्षेत्री आणि क्षितिज पवार यांचा समावेश होता. विजयी संघाला संघ व्यवस्थापक पी. एल. देवतळे, हरिश नागले, गणेश पेंदोर, क्रिडा समन्वयक सुनिल जगताप, किशोर गव्हाणे, लक्ष्मी थकुरडे, प्राचार्य डॉ. विद्या बॅकॉड यांनी मार्गदर्शन केले. पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, युवा उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी उपविजेत्या संघाचे अभिनंदन केले.



### महिला दिन उत्सव उत्साहात साजरा

केशवनगर (दैनिक संध्या) : दिनांक ८ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय महिला दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन ब्रह्माकुमारीज संगीतमय योग यांच्या वतीने करण्यात आले होते. या उपक्रमात सुमारे ५० महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमाला नगरसेविका मनिषा चिंचवडे व अपर्णा डोके या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. त्यांच्या उपस्थितीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. कार्यक्रमात बी. के. ज्योती दीदी यांनी महिला दिनाचे महत्त्व, आत्मशक्ती, आत्मसन्मान तसेच समाजातील महिलांची भूमिका यावर मार्गदर्शन केले. तसेच बी. के. आकांक्षा दीदी यांनी ध्यान (मेडिटेशन) सत्र घेतले. या सत्रामुळे महिलांमध्ये आत्मचिंतन, आत्मविश्वास व सकारात्मक दृष्टिकोन निर्माण झाला. महिलांनी विविध गुणदर्शन सादरीकरणे, अध्यात्मिक परिक्षा आणि कला प्रदर्शन करून आपली कौशल्ये मांडली. यावेळी मीना पोखरणा यांनी साकारलेली आकर्षक रांगोळी विशेष लक्षवेधी ठरली. संपूर्ण कार्यक्रम योग, ध्यान, संगीत व अध्यात्मिक उपक्रमांनी आनंदी व सकारात्मक वातावरणात पार पडला कार्यक्रमाच्या शेवटी सहभागी महिलांचा सन्मान करण्यात आला. उपस्थित महिलांनी व्यक्त केले की अशा उपक्रमांमुळे आत्मभान जागृत होते आणि जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन अधिक सकारात्मक होतो. ब्रह्माकुमारीज संगीतमय योग सत्र दररोज सकाळी ६ ते ७ वाजता जिजाऊ गार्डन येथे निशुल्क घेतले जाते. दररोजच्या योगामध्ये सहभागी होण्यासाठी दीपक वाडेकर (मो. 9067319114) यांच्याशी संपर्क साधावा, असे निवेदन यावेळी करण्यात आले.



### आदिशक्ती स्नॅक्स सेंटरचा शुभारंभ

केशवनगर (दैनिक संध्या) : सौ. आरती सुनील कोशे, भूषण सुनील कोशे यांनी मोरया गोसावी यांच्या पदस्पर्श ने पावन झालेल्या चिंचवडच्या पुण्यभूमीत, सद्गुरू श्री गोंदवलेकर महाराजांच्या कृपेनें नवे आदिशक्ती स्नॅक्स सेंटर सुरु केले. चिंचवड गावातून काळेवाडी कडे जाणाऱ्या रस्त्यावर कल्याण प्रतिष्ठान ( सुखी भवन ) शेजारी हे "आदिशक्ती स्नॅक्स सेंटर अँड लंच होम " सुरू झाले आहे. कामगार बहुल तसेच मध्यमवर्गीय वस्ती असल्यामुळे विद्यार्थी, नोकरदार दर्जेदार व परवडणाऱ्या दरात स्नॅक्स आणि जेवण उपलब्ध करून देण्यासाठी ही आदिशक्ती महिला दिनानिमित्त सुरू झाली आहे. साहित्यिक पत्रकार बाबू डिसोजा त्यांच्या पत्नी व्हिडिओ जर्नालिस्ट सौ.माधुरी डिसोजा कुमठेकर विशेष निमंत्रित होते.आसपासचे नागरिक,ब्राह्मण महासंघाचे कार्यकर्ते, कार्यकारी सदस्य याप्रसंगी शुभेच्छा देण्यासाठी उपस्थित होते.



# पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाचा घेतला आढावा

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आढावा बैठक पार पडली. यावेळी शहरातील भटक्या श्वानांच्या व्यवस्थापनासोबतच त्यांचे संगोपन, आरोग्य सेवा आणि नागरिकांच्या तक्रारींचे प्रभावी निवारण यासाठी ठोस उपाययोजना करा. पिंपरी चिंचवड शहरात श्वान संगोपन केंद्रासाठी प्रभागनिहाय जागा शोधा, अशा सूचना महापौर रवि लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, अतिरीक्त आयुक्त विक्रांत बगाडे, नगरसदस्या वैशाली काळभोर, वैशाली घोडेकर, अर्चना सस्ते, नगरसदस्य अनंत कोऱ्हाळे, मंदार देशपांडे, उत्तम केंदळे, संजय काटे, सुहास कांबळे, उपायुक्त संदीप खोत, अण्णा बोदडे, पशुवैद्यकीय अधिकारी अरुण दगडे तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान महापौर रवि लांडगे यांनी शहरात श्वान संगोपन केंद्र उभारण्याबाबत विशेष भर देत, यासाठी प्रभागनिहाय उपलब्ध जागांची पाहणी करण्याच्या सूचना दिल्या. या केंद्रांच्या माध्यमातून भटक्या श्वानांचे संगोपन, लसीकरण, उपचार तसेच नसबंदी प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविता येईल, असे त्यांनी नमूद केले. यासाठी संबंधित नगरसदस्यांच्या सहकार्याने प्रभागनिहाय योग्य जागा निश्चित करून त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तसेच शहरातील भटक्या व पाळीव श्वानांची अचूक संख्या, त्यांचे वितरण तसेच नसबंदी आणि लसीकरणाची सद्यस्थिती याबाबत सविस्तर सर्वेक्षण करून अहवाल तयार करण्याचे आदेश महापौरांनी दिले. शहरातील नागरिकांकडून येणाऱ्या श्वानांबाबतच्या तक्रारींचे तात्काळ व प्रभावी निवारण करण्यासाठी पशुवैद्यकीय विभागाने समन्वयाने काम करण्याचेही त्यांनी सांगितले.

शहरातील भटक्या श्वानांच्या संख्येवर नियंत्रण ठेवणे, त्यांचे आरोग्य संवर्धन करणे तसेच नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने अधिक नियोजनबद्ध आणि परिणामकारक पद्धतीने काम करावे, असे निर्देशही महापौर रवि लांडगे यांनी यावेळी दिले.

यावेळी उपायुक्त संदीप खोत यांनी पशुवैद्यकीय विभागामार्फत करण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शहरात प्राणी जन्मनियंत्रण (ABC) अंतर्गत नसबंदी मोहिमेसाठी सध्या चार विशेष वाहने कार्यरत असून, या वाहनांद्वारे श्वान पकडणे, नसबंदी करणे आणि त्यांना पुन्हा त्यांच्या परिसरात सोडणे ही प्रक्रिया राबविली जात आहे. तसेच जखमी किंवा आजारी प्राण्यांवर उपचार करणे आणि नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करण्यासाठीही ही वाहने वापरण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.

या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना आवश्यक तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले असून, प्राण्यांशी संवेदनशील पद्धतीने वागण्याबाबत विशेष मार्गदर्शनही देण्यात आले आहे. श्वान संगोपन केंद्र उभारण्यासाठी शहरातील काही संभाव्य जागांची प्राथमिक पाहणी देखील करण्यात आली असून, त्याबाबत पुढील कार्यवाही सुरू असल्याचे उपायुक्त खोत यांनी सांगितले.

## पिंपरी-चिंचवड महापालिकेवर ठेकेदारांसमोर ५२८ कोटींचे दायित्व

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने अनेक विकासकामे केली जातात. मात्र, काही कारणांमुळे प्रकल्प मध्येच बंद पडतात किंवा काही वाद व तंटा निर्माण होतात. त्यामुळे प्रकल्प ठप्प पडतो किंवा ठेकेदार बदलला जातो. अशाच दोन प्रकरणात महापालिका प्रशासनाला तब्बल 528 कोटी रुपयांचे संबंधित ठेकेदारांला नुकसान भरपाई म्हणून द्यावी लागणार आहेत. त्यामुळे महापालिकेची देणी संपता संपत नसून, ती वाढतच असल्याचे स्पष्ट होत आहे. पवना बंदीस्त जलवाहिनी प्रकल्पाच्या विरोधात शेतकऱ्यांनी रास्ता रोको केला. त्यात झालेल्या गोळीबारात काही शेतकऱ्यांचा मृत्यू तर, काही शेतकरी जखमी झाले. आंदोलनानंतर ते काम 9 ऑगस्ट 2011 पासून ठप्प आहे. राज्य शासनाने 8 सप्टेंबर 2023 ला त्या कामावरील स्थगिती उठवली. त्यानंतर महापालिकेने नवीन सुधारित आराखडा तयार केला आहे. पूर्वी या कामास सुमारे 400 कोटी रूपये खर्च होता.

## "इन्स्पायर २०२६" या आंतरराष्ट्रीय परिषदेचे एसबीपीआयएम मध्ये आयोजन

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट (एसबीपीआयएम) यांच्या वतीने "इन्स्पायर २०२६" या दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन दि. १३ आणि १४ मार्च २०२६ रोजी करण्यात आले असल्याची माहिती एसबीपीआयएम च्या संचालिका डॉ. किर्ती धारवाडकर यांनी प्रसिद्धीस दिली आहे. परिषदेत "शाश्वत जागतिक भविष्यासाठी व्यवसायिक नव संकल्पनांचा मार्ग"या महत्त्वपूर्ण विषयावर देश विदेशातील संशोधक, प्राध्यापक, उद्योगतज्ज्ञ व विद्यार्थ्यांचा सहभाग राहणार आहे. परिषदेचे उद्घाटन उद्योजक डॉ. प्रशांत पानसरे यांच्या हस्ते होणार आहे. भारत, अमेरिका, युनायटेड किंगडम, कॅनडा, फिलिपिन्स, थायलंड, लेबनॉन आणि दुबई आदी देशांतील संशोधकांनी यासाठी नोंदणी केली आहे. यामध्ये ५३८ लेखक सहभागी होणार आहे. तसेच २४० संशोधन लेख सादर करण्यात येणार आहेत.

परिषदेसाठी संस्थेच्या संचालिका डॉ. कीर्ती धारवाडकर, शैक्षणिक विभाग प्रमुख डॉ. रूपाली कुदरे, डॉ. दिलीप पवार, डॉ. योगेंद्र देवकर, डॉ. काजल माहेश्वरी आणि डॉ. संतोष शिंदे समन्वयक म्हणून काम करत आहेत.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर तसेच कार्यकारी संचालक डॉ. गिरीष देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या आंतरराष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे.

## शहरात श्वान संगोपन केंद्रासाठी प्रभागनिहाय जागा शोधा – महापौर रवि लांडगे

*पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाचा घेतला आढावा*

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाच्या कामकाजाचा आढावा घेण्यासाठी महापौर रवि लांडगे यांच्या अध्यक्षतेखाली पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील दिवंगत महापौर मधुकरराव पवळे सभागृहात आढावा बैठक पार पडली. यावेळी शहरातील भटक्या श्वानांच्या व्यवस्थापनासोबतच त्यांचे संगोपन, आरोग्य सेवा आणि नागरिकांच्या तक्रारींचे प्रभावी निवारण यासाठी ठोस उपाययोजना करा. पिंपरी चिंचवड शहरात श्वान संगोपन केंद्रासाठी प्रभागनिहाय जागा शोधा, अशा सूचना महापौर रवि लांडगे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

या बैठकीस उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्या वैशाली काळभोर, वैशाली घोडेकर, अर्चना सस्ते, नगरसदस्य अनंत कोऱ्हाळे, मंदार देशपांडे, उत्तम केंदळे, संजय काटे, सुहास कांबळे, उपायुक्त संदीप खोत, अण्णा बोदडे, पशुवैद्यकीय अधिकारी अरुण दगडे तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान महापौर रवि लांडगे यांनी शहरात श्वान संगोपन केंद्र उभारण्याबाबत विशेष भर देत, यासाठी प्रभागनिहाय उपलब्ध जागांची पाहणी करण्याच्या सूचना दिल्या. या केंद्रांच्या माध्यमातून भटक्या श्वानांचे संगोपन, लसीकरण, उपचार तसेच नसबंदी प्रक्रिया अधिक प्रभावीपणे राबविता येईल, असे त्यांनी नमूद केले. यासाठी संबंधित नगरसदस्यांच्या सहकार्याने प्रभागनिहाय योग्य जागा निश्चित करून त्याबाबतचा सविस्तर प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. तसेच शहरातील भटक्या व पाळीव श्वानांची अचूक संख्या, त्यांचे वितरण तसेच नसबंदी आणि लसीकरणाची सद्यस्थिती याबाबत सविस्तर सर्वेक्षण करून अहवाल तयार करण्याचे आदेश महापौरांनी दिले. शहरातील नागरिकांकडून येणाऱ्या श्वानांबाबतच्या तक्रारींचे तात्काळ व प्रभावी निवारण करण्यासाठी पशुवैद्यकीय विभागाने समन्वयाने काम करण्याचेही त्यांनी सांगितले.



या कामासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना आवश्यक तांत्रिक प्रशिक्षण देण्यात आले असून, प्राण्यांशी संवेदनशील पद्धतीने वागण्याबाबत विशेष मार्गदर्शनही देण्यात आले आहे. श्वान संगोपन केंद्र उभारण्यासाठी शहरातील काही संभाव्य जागांची प्राथमिक पाहणी देखील करण्यात आली असून, त्याबाबत पुढील कार्यवाही सुरू असल्याचे उपायुक्त खोत यांनी सांगितले.

शहरातील भटक्या श्वानांच्या संख्येवर नियंत्रण ठेवणे, त्यांचे आरोग्य संवर्धन करणे तसेच नागरिकांना सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाने अधिक नियोजनबद्ध आणि परिणामकारक पद्धतीने काम करावे, असे निर्देशही महापौर रवि लांडगे यांनी यावेळी दिले. यावेळी उपायुक्त संदीप खोत यांनी पशुवैद्यकीय विभागामार्फत करण्यात येत असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. शहरात प्राणी जन्मनियंत्रण (ABC) अंतर्गत नसबंदी मोहिमेसाठी सध्या चार विशेष वाहने कार्यरत असून, या वाहनांद्वारे श्वान पकडणे, नसबंदी करणे आणि त्यांना पुन्हा त्यांच्या परिसरात सोडणे ही प्रक्रिया राबविली जात आहे. तसेच जखमी किंवा आजारी प्राण्यांवर उपचार करणे आणि नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारींवर तात्काळ कार्यवाही करण्यासाठीही ही वाहने वापरण्यात येत असल्याची माहिती त्यांनी दिली.



## इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरला महापौर रवि लांडगे यांची भेट

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या निगडी येथील इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटर (ICCC) येथे महापौर रवि लांडगे यांनी भेट देऊन शहरातील विविध नागरी सेवांचे तांत्रिक पद्धतीने करण्यात येणारे मॉनिटरिंग व नियंत्रण प्रणालीची सविस्तर माहिती घेतली. स्मार्ट सिटी संकल्पनेअंतर्गत उभारण्यात आलेल्या या कमांड सेंटरच्या माध्यमातून शहरातील विविध नागरी सेवा, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता व्यवस्थापन तसेच आपत्कालीन परिस्थितीत देण्यात येणाऱ्या प्रतिसाद प्रणालीचे एकाच ठिकाणाहून रिअल-टाईम निरीक्षण केले जाते. या प्रणालीमुळे शहरातील विविध घडामोडींवर त्वरित लक्ष ठेवणे तसेच संबंधित विभागांशी समन्वय साधून आवश्यक ती कार्यवाही करणे अधिक सुलभ झाले आहे. अशी माहिती कार्यकारी अभियंता अभिमान भोसले यांनी महापौर रवि लांडगे यांना दिली. या भेटीदरम्यान महापौर रवि लांडगे यांनी शहरातील सीसीटीव्ही सर्व्हेलन्स यंत्रणा, वाहतूक नियंत्रण व्यवस्था, स्वच्छता व्यवस्थापन प्रणाली तसेच विविध विभागांचे रिअल-टाईम मॉनिटरिंग याबाबत अधिकाऱ्यांकडून माहिती घेतली. शहरातील नागरिकांना सुरक्षित, सुकर व अधिक कार्यक्षम नागरी सेवा देण्यासाठी इंटिग्रेटेड कमांड अँड कंट्रोल सेंटरची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

# नागरिकांना केंद्रबिंदू मानून शहर सुधारण्याची संरचना तयार करणार – संजय नाना काटे

## शहर सुधारणा समितीच्या बैठकीत आरोग्य, झोपडपट्टी, पर्यावरण, स्वच्छता आदी विषयांचा सविस्तर आढावा

**पिंपरी (दै. संध्या) :**

पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांच्या मूलभूत गरजा लक्षात घेऊन त्यांच्या जीवनमानात अधिक सुधारणा करण्यासाठी नागरिकांना केंद्रबिंदू मानून शहर सुधारण्याची सर्वसमावेशक संरचना तयार करण्यात येणार आहे. शहराचा विकास करताना नागरिकांच्या आरोग्य, स्वच्छता, पर्यावरण आणि सुरक्षिततेला प्राधान्य देत नियोजनबद्ध पद्धतीने कामे राबविण्यात येणार आहेत, अशी माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या शहर सुधारणा समितीचे सभापती संजय नाना काटे यांनी दिली.



शहर सुधारणा समितीची बैठक महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीमधील दिवंगत माजी महापौर मधुकरराव पवळे सभागृहात समितीचे सभापती संजय नाना काटे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या बैठकीत शहर विकासाशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या बैठकीस माजी महापौर तथा नगरसदस्या वैशाली घोडेकर-लोंढे, नगरसदस्या वैशाली काळभोर, अर्चना सस्ते, नगरसदस्य डॉ. सुहास कांबळे, उत्तमराव केंदळे, अनंत कोऱ्हाळे यांच्यासह महापालिकेचे नगरसचिव मुकेश कोळप, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, उपायुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता हरविंदर सिंह बन्सल, विशेष अधिकारी किरण गायकवाड यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत शहराच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. शहरातील स्वच्छता व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी नियमित साफसफाई, कचरा संकलन व कचरा व्यवस्थापन यावर विशेष भर देण्यात यावा. तसेच शहरातील व्यापार व उद्योगांना आवश्यक असलेल्या परवानग्या पारदर्शक व सुलभ पद्धतीने देण्यात याव्यात, अशा सूचना संबंधित विभागांना सभापती काटे यांनी केल्या.

मोशी येथे उभारण्यात येत असलेल्या दुसऱ्या वेस्ट टू एनर्जी प्रकल्पाच्या कामाला गती देण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. या प्रकल्पामुळे शहरातील कचरा व्यवस्थापन अधिक प्रभावी होऊन पर्यावरण संवर्धनासही मोठी मदत होणार असल्याचे सांगण्यात आले. तसेच विकास आराखडा (डीपी) संदर्भातील हरकती व सूचना लवकरात लवकर निकाली काढून नियोजनबद्ध विकास साधण्यावर भर दिला जावा, असेही स्पष्ट करण्यात आले.

शहरातील झोपडपट्टी भागातील नागरिकांना आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून देणे, पात्र लाभार्थ्यांना सदनिका उपलब्ध करून देणे, तसेच गरजू नागरिकांना वैद्यकीय मदत पोहोचविण्याबाबतही संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. याशिवाय शहरातील नद्यांच्या काठावरील अतिक्रमणे हटवून पर्यावरण संतुलन राखण्यासाठी आवश्यक कारवाई करण्याबाबतही निर्देश देण्यात आले.

**थोडक्यात पण महत्वाचे...**




## अनेकान्त अकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे सीए फाउंडेशन परीक्षेत यश

बारामती (दैनिक संध्या) : अनेकान्त एज्युकेशन सोसायटी अंतर्गत तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील अनेकान्त अकॅडमीच्या सीए फाउंडेशन कोर्सच्या विद्यार्थ्यांनी जानेवारी २०२६ मध्ये झालेल्या परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या परीक्षेत कृष्णा शांतीलाल परदेशी आणि प्रणव प्रशांत धोकटे या विद्यार्थ्यांनी यश मिळवून महाविद्यालयाचे नाव उज्वल केले. जिद्द, चिकाटी आणि सातत्यपूर्ण अभ्यासाच्या जोरावर या विद्यार्थ्यांनी हे यश संपादन केले आहे. यशस्वी विद्यार्थ्यांचा तसेच त्यांच्या पालकांचा सत्कार महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश जगताप आणि रजिस्ट्रार अभिनंदन शहा यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी सर्व विषय शिक्षक उपस्थित राहून विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे व्यावसायिक शिक्षण मिळावे या उद्देशाने अनेकान्त एज्युकेशन सोसायटीतर्फे हा अभ्यासक्रम सुरू करण्यात आला असून, विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी संस्था सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर, संस्थेचे पदाधिकारी व सदस्य, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, उपप्राचार्य प्रा. गोरखनाथ मोरे, रमेश गोसावी, सर्व प्राध्यापक, रजिस्ट्रार, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले.

## 'बंजारा' समावेशासाठीची उच्चस्तरीय अभ्यास समिती रद्द करा!

■ ट्रायबल फोरमची मागणी: राज्यपाल, मुख्यमंत्री यांना निवेदन

बारामती (दैनिक संध्या) : बंजारा प्रवर्गातील उपवर्गासह सदर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्याबाबतची मागणी तपासण्यासाठी अभ्यास करून अहवाल सादर करण्यासाठी उच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली २७ फेब्रुवारी २०२६ रोजी समिती स्थापन करण्यात आलेली समिती रद्द करा. अशी मागणी महामहीम राज्यपाल, मुख्यमंत्री यांच्याकडे ट्रायबल फोरम कोकण विभागाचे विभागीय कार्याध्यक्ष सुनील झळके यांनी निवेदनाद्वारे केली आहे. राज्यात 'बंजारा' समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश करण्यात येऊ नये या मागणीसाठी गेल्या सहा महीण्यापूर्वी राज्यातील आदिवासी समाजाने हजारों, लाखोंच्या संख्येने रस्त्यावर उतरुन मोर्चे काढले.या मोर्चातून आदिवासी समाजाने प्रखर विरोध केला. हे सर्वश्रुत असताना आदिवासी समाजाच्या विरोधाला न जुमानता मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली ४ नोव्हेंबर २०२५ रोजी सह्याद्री अतिथी ग्रुहावर बैठक पार पडून 'बंजारा' प्रवर्गातील उपप्रवर्गासह सदर समाजाचा अनुसूचित जमातीत समावेश करण्याची मागणी तपासून अहवाल सादर करण्यासाठी उच्च न्यायालयाचे निव्रुत न्यायाधीश यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्याची जबाबदारी आदिवासी विकास विभागावर सोपविण्यात आली. आदिवासी विकास विभागाने आता समितीचे गठण केले आहे. ही समिती तीन महीण्यात आपला अहवाल सादर करणार आहे. त्यामुळे आदिवासी समाजात भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. राज्य शासनाने 'बंजारा' जातीचा अनुसूचित जमातीच्या यादीत समावेश करण्यासाठी १२ जून १९७९ रोजी केंद्र शासनाला प्रस्ताव पाठविला होता. 'बंजारा' समाज आदिवासींचे निकष पुर्ण करीत नसल्यामुळे केंद्र शासनाने नाकारले होते.राज्यशासनानेही स्वतःचा प्रस्ताव ६ नोव्हेंबर १९८१ रोजी पुर्ण विचारांती मागे घेतला होता.तरीही तब्बल ४४ वर्षानंतर पुन्हा बंजारा समावेशासाठी राज्यशासनाने उच्चस्तरीय समिती स्थापन केली आहे. केंद्र शासनाने ६ फेब्रुवारी १९८१ रोजी एखाद्या जातीचा अनुसूचित जमातीत समावेश करण्यासाठी प्राचीन जीवनमान, भौगोलिक अलिप्तता, भिन्न संस्कृती, स्वभावातील बुजरेपणा, मागासलेपणा हे पाच निकष निर्धारित केले होते.हे निकष 'बंजारा' पुर्ण करीत नाही.तरीही जाणीवपूर्वक आदिवासी समाजात घुसविण्यासाठी प्रयत्न होत आहेत.बंजारा आदिवासी नाहीत.



## स्व. प्रल्हाद ज्ञानदेव आबनावे यांचे निधन

कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : साने गुरुजी शिक्षण संस्थेचे संचालक, हडपसर (पुणे), राष्ट्र सेवा दलाचे ज्येष्ठ नेते, विविध संस्था-संघटनांचे पदाधिकारी तसेच सामाजिक कार्यकर्ते व करारी व्यक्तिमत्त्व स्व.प्रल्हाद ज्ञानदेव आबनावे यांचे निधन वयाच्या ८२ व्या वर्षी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात १ मुलगा, ५ मुली असा मोठा परिवार आहे.

# राज्यस्तरीय परिषद व पोस्टर स्पर्धा उत्साहात

बारामती (दै. संध्या)




अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या कॉलेज ऑफ फार्मसी येथे "इमर्जिंग नॉवेल ट्रेंड्स इन फार्मास्युटिकल सायन्सेस : अकॅडेमिया, इंडस्ट्री अँड एन्त्रेप्रेनेऊरशिप" या विषयावर डिप्लोमा फार्मसी विद्यार्थ्यांसाठी एकदिवसीय राज्यस्तरीय परिषद आणि पोस्टर सादरीकरण स्पर्धा उत्साहात पार पडली. या परिषदेत फार्मास्युटिकल क्षेत्रातील नवीन संशोधन, उद्योगातील संधी तसेच उद्योजकतेच्या संधींबाबत तज्ज्ञांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमास अनेकान्त एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष जवाहर शाह वाघोलीकर, सचिव मिलिंद शाह वाघोलीकर तसेच खजिनदार विकास शाह लेंग्रेकर यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ. राजेंद्र दोशी ढाकाळकर (सदस्य – गव्हर्निंग कौन्सिल, अनेकान्त एज्युकेशन सोसायटी कॉलेज ऑफ फार्मसी, बारामती) उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

या परिषदेत अतिथी वक्ते म्हणून प्रवीण पी. जावळे (सीनियर लेक्चरर, भारती विद्यापीठ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी, पुणे), प्रवीण एन. जगताप (डायरेक्टर, पासिफ्लोरा लॅबोरेटरीज प्रा. लि., पुणे) आणि श्रीकांत व्ही. क्षीरसागर (टेक्निकल डायरेक्टर, चाकण लाईफ सायन्सेस प्रा. लि., पुणे) यांनी विद्यार्थ्यांना उद्योग, संशोधन आणि करिअर संधींबाबत मार्गदर्शन केले.

यावेळी डॉ. श्रीमंत खाडे, डॉ. अविनाश जगताप (प्राचार्य, तुळजाराम चतुरचंद महाविद्यालय), प्रा. प्रणाली वडेर (प्राचार्या, अनेकान्त इंग्लिश मीडियम स्कूल), डॉ. धनंजय बागुल (संचालक, अनेकान्त इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज) आणि अभिनंदन शाह (रजिस्ट्रार, तुळजाराम चतुरचंद कॉलेज, बारामती) आदी मान्यवर उपस्थित होते.

परिषदेदरम्यान विविध विषयांवर पोस्टर सादरीकरण स्पर्धा घेण्यात आली. महाराष्ट्रातील विविध महाविद्यालयांमधील २७५ डिप्लोमा फार्मसी विद्यार्थी, प्राध्यापक व संशोधक यांनी परिषदेत उत्साहाने सहभाग घेतला. यापैकी ६२ विद्यार्थ्यांनी संशोधनाधारित पोस्टर सादर केली.

स्पर्धेचे परीक्षण प्रा. राजेंद्र बांदल, प्रा. श्रीकांत कदम आणि डॉ. गणेश तावरे (शिवनगर विद्या प्रसारक मंडळ कॉलेज ऑफ फार्मसी, माळेगाव-बारामती) यांनी केले. विजेत्यांना प्रथम पारितोषिक रु. ३०००, द्वितीय पारितोषिक रु. २००० आणि तृतीय पारितोषिक रु. १००० देऊन गौरविण्यात आले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दर्शन शहा यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. परिषदेसाठी डॉ. संतोष जाधव (विभागप्रमुख – फार्मसी), डॉ. सोनाली झारगड (परिषद समन्वयक) आणि प्रा. आनंद विठ्ठलदास (आयोजक सचिव) तसेच सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

## दुबईत अडकलेले जाधव कुटुंब बेनकेंच्या मदतीमुळे परतले मायदेशी

नारायणगाव (दै. संध्या)



जुन्नर तालुक्यातील आळेफाटा येथील व्यावसायिक राजेंद्र जाधव हे कुटुंबासह दुबईला गेले होते. मात्र तिथे चाललेल्या युद्धामुळे ते तिथेच अडकून होते. त्यावेळी त्या जाधव कुटुंबाला अमित बेनके यांनी प्रशासनाशी सातत्याने संपर्क ठेवून धीर देत पाठपुरावा केला. ज्यामुळे जाधव कुटुंबाचे मायदेशी सुखरूप परतने शक्य झाले. व्यावसायिक जाधव यांनी सांगितले की,26 फेब्रुवारी 2026 रोजी कुटुंबासह दुबईला पर्यटणासाठी गेलो होतो . 28 फेब्रुवारी रोजी दुबईतील बुर्ज खलिफा परिसरात असताना आम्हाला आकाशात मिसाईलसदृश वस्तू दिसल्याने मोठी घबराट पसरली होती. त्यानंतर आम्ही तातडीने सुरक्षित ठिकाणी धाव घेतली. विमान सेवा ही बंद असल्याने ते तिथेच अडकून राहिले. त्यावेळी आम्ही अमित बेनके यांच्याशी संपर्क साधला. बेनके यांनी भारतीय दूतावास आणि प्रशासनाशी संपर्क साधून परिस्थितीची माहिती घेत कुटुंबाला भारतात परतण्यासाठी मार्गदर्शन केले. अखेर 5 मार्च रोजी विमान सेवा पुन्हा सुरू झाल्यानंतर आम्ही भारताकडे प्रस्थान केले. 6 मार्च रोजी आम्ही पुणे विमानतळावर दाखल झालो. सुखरूप मायदेशी परतल्याबद्दल जाधव कुटुंबाने समाधान व्यक्त केले.

## नारायणगावमध्ये 'नो पार्किंग' चलनावरून आरटीओवर आरोप

**कारवाईची मागणी**

नारायणगाव (दै. संध्या)




नारायणगाव येथे ग्राहकांनी उभ्या केलेल्या वाहनांवर 'नो पार्किंग'चे चलन केल्याच्या प्रकरणावरून आरटीओ प्रशासनावर नाराजी व्यक्त करण्यात येत आहे. या संदर्भात भाजपाचे माजी जिल्हा उपाध्यक्ष नामदेव अण्णा खैरे यांनी संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

खैरे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, ९ मार्च २०२५ रोजी पिंपरी-चिंचवड उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील (RTO) अधिकारी नारायणगाव बायपास सोडून शहरातील फुलसुंदर मार्केट परिसरात आले होते. या ठिकाणी खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांच्या वाहनांचे फोटो काढून त्यांच्यावर 'नो पार्किंग'चे चलन करण्यात आले. मात्र त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे 'नो पार्किंग'चे फलक नसल्याचा आरोप करण्यात आला आहे.

जुन्नर तालुक्यात मोठ्या प्रमाणावर खडी व वाळू वाहतूक सुरू असतानाही नगर–कल्याण रोड, पुणे–नाशिक महामार्ग अशा महत्त्वाच्या मार्गांवर लक्ष न देता बाजारात आलेल्या नागरिकांवर कारवाई करण्यात आल्याचा आरोप खैरे यांनी केला आहे. मार्चअखेरचे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी सामान्य नागरिकांवर दंड लादला जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या संदर्भात संबंधित वरिष्ठ अधिकारी जाधव आणि मोरे यांच्याशी दूरध्वनीवर संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी प्रतिसाद दिला नसल्याचेही खैरे यांनी सांगितले. त्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, "माझ्यासारख्या पक्षाच्या माजी जिल्हा उपाध्यक्षाचा फोन जर घेतला जात नसेल, तर सामान्य नागरिकांना न्याय कसा मिळणार?"

काही वाहनचालकांच्या म्हणण्यानुसार, संबंधित महिला अधिकारी रस्त्याच्या मधोमध उभे राहून वाहने अडवत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी संबंधित अधिकाऱ्यांकडून अधिकाराचा गैरवापर होत असल्याचा आरोप करत तत्काळ चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नामदेव अण्णा खैरे यांनी केली आहे. अन्यथा या विरोधात जनआंदोलन उभारण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

## मिनी सरस सावित्री जत्रेत ग्रामीण महिलांच्या उत्पादनांना आंतरराष्ट्रीय दाद

नाझरे सुपे (दै. संध्या)




पुणे जिल्हा परिषद आयोजित "मिनी सरस सावित्री जत्रा २०२६" या जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन उपक्रमात ग्रामीण महिलांच्या उद्योजकतेला मोठे व्यासपीठ मिळत असून जत्रेला देशाबरोबरच आंतरराष्ट्रीय स्तरावरही दाद मिळत आहे. नुकतीच युगांडा सरकारच्या शिष्टमंडळाने जत्रेला भेट देत स्वयंसहाय्यता समूहांच्या उत्पादनांचे कौतुक केले. पुणे जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. चंद्रकांत वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक श्रीमती शालिनी कडू यांच्या नेतृत्वाखाली या जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता समूहांच्या महिलांनी तयार केलेल्या विविध हस्तकला वस्तू, खाद्यपदार्थ, घरगुती उत्पादने आणि पारंपरिक वस्तूंचे येथे प्रदर्शन व विक्री होत आहे. या जत्रेला काल युगांडा सरकारच्या शिष्टमंडळाने विशेष भेट दिली. इंजिनिअरिंग डेव्हलपमेंट अँड इनोव्हेशन सेंटर, सार्वजनिक सेवा मंत्रालय तसेच विज्ञान, तंत्रज्ञान व नवोपक्रम मंत्रालयाचे प्रतिनिधी या शिष्टमंडळात सहभागी होते. त्यांनी विविध स्टॉलना भेट देऊन महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांची पाहणी केली आणि काही वस्तूंची खरेदी करून महिलांच्या उद्योजकतेचे कौतुक केले. जत्रेच्या निमित्ताने आयोजित खरेदीदार–विक्रेता मेळाव्यालाही विविध कंपन्या आणि खरेदीदार गटांनी भेट देत स्वयंसहाय्यता समूहांच्या उत्पादनांची माहिती घेतली. अनेक उत्पादनांसाठी ऑर्डर्सही नोंदवण्यात आल्या. तसेच महिलांना व्यवसायवृद्धीसाठी आवश्यक मार्गदर्शन मिळावे यासाठी उत्पादनांचे मार्केटिंग कसे करावे यावर विशेष मार्गदर्शन सत्र आयोजित करण्यात आले. कार्यक्रमात सांस्कृतिक सादरीकरणांनीही वातावरण रंगतदार केले. आंबेगाव तालुक्यातील तिरपाड ग्रामपंचायतीच्या महिलांनी पारंपरिक लेझीम नृत्य सादर केले, तर बारामती येथील महिलांनी स्वयंसहाय्यता समूहांच्या कार्यावर आधारित प्रभावी पथनाट्य सादर केले. याशिवाय लोकप्रिय युट्यूब चॅनल "सरिताज किचन्स"च्या सरिता पद्मन यांनी व्हेज बिर्याणीचे प्रात्यक्षिक दाखवत महिलांना खाद्य व्यवसायातील संधींबाबत मार्गदर्शन केले. ग्रामीण संस्कृती आणि महिलांच्या उद्योजकतेचा संगम असलेली "मिनी सरस सावित्री जत्रा २०२६" १० व ११ मार्च रोजीही नागरिकांसाठी खुली असून मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहून स्वयंसहाय्यता समूहांच्या उत्पादनांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

"स्वयंसहाय्यता समूहांच्या महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि त्यांच्या उद्योजकतेला चालना देणे हा या जत्रेचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांचा मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे."

## परप्रांतीय मजूर स्थानिक मजुरांना पडू लागला भारी

नारायणगाव (दै. संध्या)



जुन्नर तालुक्यात सध्या कांदा काढणीला वेग आला असून स्थानिक मजुरांची संख्या कमी होऊन परराज्यातील कष्टकरी कामगारांची संख्या वाढली आहे. मध्य प्रदेश तसेच विविध राज्यात स्थानिक पातळीवर रोजगाराच्या मर्यादित संधी आणि शेती कामाची कमी उपलब्धता यामुळे हे मजूर लोक आपल्या कुटुंबासह भारतात मजुरीसाठी येत असतात. स्थानिक मजूर हे रोजंदारीवर काम करतात तर परराज्यातील मजूर ठराविक काम 'उक्ते' (ठराविक रकमेने पूर्ण काम ) स्वरूपात घेऊन कमी कालावधीत ते पूर्ण करतात.शेतकऱ्याने जर राहण्याची सोय करून दिल्यास पती -पत्नीसह कुटुंबातील इतर सदस्यही काम जलद गतीने पूर्ण करतात.यामुळे शेतकऱ्यांनाही हे काम परवडणारे आणि वेळेत पूर्ण होणारे ठरत असल्यामुळे ते परराज्यातून येणाऱ्या मजुरांना काम ठरवून त्यांच्याकडून काम करून घेत आहेत. परराज्यातील एका मजुराने सांगितले की, आम्ही उन्हाळ्यात रोजगाराच्या शोधात पुणे जिल्ह्यात येतो आणि पावसाळा सुरू झाला की परत आमच्या गावी जातो. पती-पत्नी मिळून दिवसाला साधारण 1000 ते 1200 रुपये मिळतात. महिन्याला प्रत्येकी 30 ते 35 हजार रुपयांपर्यंत मजुरी मिळत असल्याने आम्ही या कामावर समाधानी असतो. शेतकऱ्यांच्या मते, परराज्यातील मजूर काम लवकर पूर्ण करतात आणि तक्रार करत नाहीत. राहण्याची सोय दिली तर संपूर्ण कुटुंब काम करते त्यामुळे काम लवकरात लवकर पूर्ण होण्यास मदत होते.एकंदरीत, जुन्नर तालुक्यात परप्रांतीय मजूर स्थानिक मजुरांना भारी पडू लागला आहे.

# राजे शिवछत्रपती प्रतिष्ठानचा शिवजयंती महोत्सव जल्लोषात संपन्न

## प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाबु पाटे यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम : नितीन बानगुडे पाटील यांचे व्याख्यान सपंन

नारायणगाव (दै. संध्या)



जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथे पश्चिम महाराष्ट्रातील तिथीनुसार राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान यांच्यावतीने संस्थापक अध्यक्ष योगेश उर्फ बाबु पाटे यांच्या मार्गदर्शनाखाली साजरा होणारा भव्य शिवजयंती महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या उत्सवाच्या निमित्ताने दि.५ मार्च रोजी मुक्ताई समाज मंदिर, नारायणगाव येथे मराठी गायक व संगीतकार अवधूत गांधी यांचा छत्रपती शिवाजी महाराजांवर आधारित भक्ती शक्ती संगम गीत गायनाचा कार्यक्रम पार पडला. या कार्यक्रमाला हजारो शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच यानिमित्ताने दहा दिवस महिलांसाठी तसेच लहान मुला-मुलींसाठी युद्धकला व लाठी-काठी प्रशिक्षण देण्यात आले.

मुख्य शिवजयंती दिनी (दि.६ रोजी) नारायणगाव ते जुन्नर भव्य शिवज्योत रॅली काढण्यात आली. यात हजारो शिवभक्त व शिवकन्या मोटार सायकलसह सहभागी झाले होते. या रॅलीत अंबारीवर छत्रपती शिवाजी महाराजांचा चित्ररथाने नागरिकांचे लक्ष वेधले. जुन्नर येथे शिवज्योतीचे दर्शन झाल्यानंतर पुन्हा ही शिवज्योत नारायणगावच्या दिशेने प्रस्थान झाली. सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास पश्चिम वेस ते पूर्व वेस ढोल-ताशांच्या गजरात छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. यावेळी प्रशिक्षण घेतलेल्या ग्रामस्थ व लहान मुला-मुलींनी लाठी-काठीचे प्रात्यक्षिक सादर केले.

सायंकाळी ८ वाजता मुख्य कार्यक्रमास सुरुवात झाली. दरवर्षीप्रमाणे विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. यामध्ये ज्ञाता एज्युकेशन रिसर्च अँड काउंसलिंग सेंटर, नारायणगाव, रचना संतोष कोल्हे (कृषी उपसंचालक), अशोक जगदाळे (आयर्न मॅन), दिव्या संतोष भोर (कृषी उपसंचालक), पूजा काळे आणि सुधाकर लोंढे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. याच दरम्यान 'शासन' या चित्रपटाचे प्रमोशन देखील करण्यात आले. तर शिवनेर नाट्य कला मंच नारायणगाव यांच्या माध्यमातून शिवनाट्य सादर करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे शिवव्याख्याते नितीन बानगुडे पाटील, जिल्हा परिषद माजी बांधकाम सभापती मंगलदास बांदल, जुन्नरचे आमदार शरद सोनवणे, कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक माऊली खंडागळे, नवनिर्वाचित जिल्हा परिषद सदस्या नेहा पाटे, पंचायत समिती सदस्या जयश्री बनकर व सुषमा वाव्हळ, श्री.विरोबा परिवाराचे संस्थापक अध्यक्ष बाळासाहेब पाटे, नारायणगावच्या सरपंच शुभदा वाव्हळ, माजी उपसरपंच संतोष वाजगे, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष संतोष दांगट, विकास तोडकर, डॉ.संदीप डोळे, आदी मान्यवर तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवव्याख्याते नितीन बानगुडे पाटील यांनी आपल्या अमोघ वक्तृत्व शैलीतून उपस्थितांना शिवविचारांचे अमूल्य मार्गदर्शन केले.

यानिमित्ताने राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान व ग्रामपंचायत नारायणगाव यांच्या विद्यमाने दि. १० मार्च रोजी जीवनमोती डेंटल हॉस्पिटल आणि ओम शांती ऑरगॅनिक हेल्थ कॅम्प यांनी डॉ. इम्रान शेख व जितेंद्र पुंडे यांच्या माध्यमातून दंत तपासणी व आरोग्य तपासणी शिबिर संपन्न झाले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ज्ञानेश्वर औटी, मेहबुब काझी सर यांनी केले तर आभार प्रदर्शन संतोष दांगट यांनी मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## डी. वाय. पाटील संघ अंतिम फेरीत

**विजेतेपदासाठी अनंतराव पवार कॉलेजविरुद्ध लढत; आर्की क्रिकेट अजिंक्यपद स्पर्धा**

पुणे (दैनिक संध्या) : गोलंदाजांच्या अचूक माऱ्याच्या जोरावर डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघाने श्री शिवाजी मराठा सोसायटीच्या कॉलेज ऑफ आर्किटेक्चर (एसएसएमएससीओए) यांच्या वतीने आयोजित विद्याश्री डेव्हलपर्स आर्की क्रिकेट अजिंक्यपद २.० स्पर्धेत एमआयटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघावर आठ गडी राखून मात केली आणि अंतिम फेरीत प्रवेश केला. डी. वाय. पाटील संघाची विजेतेपदासाठी अनंतराव पवार कॉलेज ऑफ आर्किटेक्चर संघाशी लढत होईल. अनंतराव पवार कॉलेजने दुसऱ्या उपांत्य लढतीत सिम्बायोसिस कॉलेजवर मात केली. सहकारनगर येथील शिंदे हायस्कूलच्या मैदानावर ही स्पर्धा सुरू आहे. बुधवारी झालेल्या पहिल्या उपांत्य लढतीत डी. वाय. पाटील कॉलेजने एमआयटीला निर्धारित पाच षटकांत ८ बाद २२ धावांतच रोखले. एमआयटीचा निम्मा संघ आठ धावांतच माघारी परतला होता. डी. वाय. पाटील कॉलेजने विजयी लक्ष्य २.३ षटकांत दोन गडींच्या मोबदल्यात सहज साध्य केले. दुसऱ्या उपांत्य लढतीत अनंतराव पवार कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने सिम्बायोसिस स्कूल ऑफ आर्किटेक्चर संघावर आठ गडी राखून सहज मात केली. सिम्बायोसिसने दिलेले ६२ धावांचे लक्ष्य अनंतराव पवार कॉलेजने ४.१ षटकांत दोन गडींच्या मोबदल्यात पूर्ण केले.

## ऑटोरिक्षा, टॅक्सी परवान्याकरिता इरादापत्र देण्याचे काम स्थगित : स्वप्नील भोसले

पुणे (दैनिक संध्या) : परिवहन मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली 9 मार्च 2026 रोजी झालेल्या बैठकीत ऑटो रिक्षा टॅक्सी परवान्यांचे खुल्या धोरणास स्थगिती देण्यात आली आहे, त्यानुसार प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत नवीन ऑटोरिक्षा, टॅक्सी परवान्याकरिता इरादापत्र देण्याचे काम स्थगित करण्यात येत आहे, याची सर्व ऑटोरिक्षा चालक, मालक, अर्जदार, संघटना यांनी नोंद घ्यावी, असे आवाहन उप प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्नील भोसले यांनी दिली आहे.




## विद्यार्थ्यांनी अनुभव आधारित नव उपक्रम, नव संकल्पना सादर केल्या पाहिजेत

**कुलगुरु डॉ. संतोष सोनवणे**

**पीसीयू येथे टेक युअर चान्स - टेक्निऑन २०२६ महोत्सव संपन्न**

पिंपरी, पुणे (दैनिक संध्या) : विद्यार्थ्यांनी केवळ सैद्धांतिक शिक्षणापुरते मर्यादित राहू नये. अनुभव आधारित नव उपक्रम, नव संकल्पना सादर केल्या पाहिजेत यासाठी पिंपरी चिंचवड विद्यापीठाच्या वतीने (पीसीयू) सुरू करण्यात आलेला "टेक युअर चान्स - टेक्निऑन २०२६" हा महोत्सव म्हणजे एक सर्वसमावेशक, मार्गदर्शक, उत्कृष्ट व्यासपीठ आहे. यामध्ये प्रयोग करा, स्पर्धा करा, नव कल्पना साकार करा आणि नेतृत्व घ्या हा मुख्य उद्देश आहे. आपली आवड आणि नवीन कल्पना प्रत्यक्ष कृती मध्ये ही एक मोठी संधी आहे, असे प्रतिपादन पीसीयूचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड विद्यापीठ (पीसीयू) साते, वडगाव मावळ येथे स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी (एसओइटी) तर्फे "टेक युअर चान्स - टेक्निऑन २०२६" तांत्रिक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कुलसचिव डॉ. अनिल महेश्वरी, प्र-कुलगुरू डॉ. सुदीप थेपडे, आऊटरीच अँड ॲडमिशन्स संचालक डॉ. रामदास बिरादार, स्टुडंट डेव्हलपमेंट अँड वेलफेअर संचालक डॉ. अंजू बाला, इंडस्ट्री–इन्स्टिट्यूट इंटरअॅक्शन सेलचे संचालक डॉ. प्रणव चरखा आदी उपस्थित होते. टेक्निऑन २०२६ मध्ये संगणक प्रोग्रामिंग प्रकल्प, मूलभूत विज्ञान, अभियांत्रिकी मॉडेल्स, हार्ड मॉडेल सादरीकरण, पोस्टर प्रेझेंटेशन्स अशा विविध तांत्रिक स्पर्धा व प्रदर्शन आयोजित केले होते. यामध्ये नव कल्पना, कौशल्य, स्पर्धात्मक, सर्जनशीलता, विश्लेषणात्मक विचारसरणी आणि वास्तव जीवनातील समस्यांवर आधारित उपाय असलेले प्रकल्प विद्यार्थ्यांनी सादर केले. त्यापैकी 'रोबो हर्डलेक्स मिशन डिझाइन अँड प्लॉट' यामधील सहभागी विद्यार्थ्यांनी रोबोट डिझाइन काढणे, तयार करणे आणि ते नियंत्रित करण्याचे काम करणे.

## गोवंडी, मानखुर्दसह दाट वस्त्यांमधील नवजात बालकांची विक्री सरकार कधी रोखणार



मुंबई (दैनिक संध्या) : मुंबईत दाट लोक वस्ती असणाऱ्या भागांमध्ये विशेषतः मानखुर्द गोवंडीमध्ये नवजात बालकांची विक्री करणाऱ्या टोळ्या कार्यरत असून या टोळ्या या सरकारी रुग्णालयामधील नवजात शिशूंची विक्री करतात. तसेच या टोळ्यांना नवजात शिशु ची माहिती तेथीलच रुग्णालयातील कर्मचारी देतात. अशा गैरप्रवृत्त कृत्य करणाऱ्या टोळ्यावरती सरकार कारवाई करणार का असा प्रश्न आमदार म्हणून नार्वेकर यांनी विधान परिषदेमध्ये विचारला. त्यावर सरकारी रुग्णालयामधील नवजात शिशूंची विक्री करणाऱ्या टोळ्या आहेत. या टोळ्यांना या रुग्णालयामधील नवजात शिशूंची नोंदणी करणारे कर्मचारी त्यांना ही माहिती पुरवत असल्याची माहिती देखील आमच्याकडे आलेली आहे. रुग्णालयामधील नवजात शिशूंची गोपनीयता ही अखंड राहिली पाहिजे. तसेच आय वी एफ करण्यासाठी येणाऱ्या डोनरची देखील गोपनीयता राहिली पाहिजे. यासाठी आम्ही रुग्णालयामध्ये आवश्यक असणारी सिक्युरिटी तैनात करू. तसेच आवश्यकता भासल्यास त्या ठिकाणी आम्ही सिक्युरिटीच्या दृष्टिकोनातून पोर्टल देखील तयार करू. तसेच नवजात शिशूंची विक्री करणारी टोळी आणि त्यांचा कुटुंबातील सदस्यांचा थेट संबंध असेल तर त्या कुटुंबातिल सदस्यांवर देखील गृह विभाग कारवाई करेल अशी माहिती गृह राज्यमंत्री योगेश कदम यांनी दिली.

# मला नेहमीच आयुष्मान खुरानासोबत काम करायचे होते

**थामाचे दिग्दर्शक, आदित्य सरपोतदार यांचे मत**

मुंबई (दै. संध्या)

थामा हा विविध शैलींचा मिलाफ असलेला एक अलौकिक रोमान्स आहे, जो भावना, रहस्य आणि पौराणिक कथांची सांगड घालून प्रेमाला एका अनपेक्षित दृष्टिकोनातून आणि सखोल मानवी कथेच्या रूपात पुन्हा सादर करतो. 'ब्युटी अँड द बीस्ट' या क्लासिक कथेला वळण देऊन, हा चित्रपट सौंदर्य, संवेदनशीलता आणि 'बीस्ट' (राक्षस) या संकल्पनेचा एका नव्या, समकालीन पद्धतीने शोध घेतो. शनिवार, 21 मार्च 2026 रोजी रात्री 8 वाजता फक्त सोनी मॅक्सवर थामाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर पाहायला विसरू नका.

सोनी मॅक्सवरील थामाच्या वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियरच्या निमित्ताने दिग्दर्शक आदित्य सरपोतदार यांनी सांगितले की त्यांना नेहमीच आयुष्मान खुरानासोबत काम करण्याची इच्छा होती. ते म्हणतात,



"सुरुवातीपासूनच तो माझी पहिली आणि एकमेव पसंती होता. आयुष्मानमध्ये एक अंगभूत भावनिक प्रामाणिकपणा आहे ज्यामुळे प्रेक्षक त्याच्याशी त्वरित जोडले जातात, मग ते जग कितीही असामान्य का असेना. आम्हाला अशा एका अभिनेत्याची गरज होती जो या काल्पनिक कथेला प्रामाणिकपणे आणि सखोलतेने वास्तवाशी जोडू शकेल आणि तो हे अगदी सहजपणे करतो. असाधारण गोष्टींना आपल्याशा वाटतील असे बनवण्याच्या त्याच्या क्षमतेमुळे त्याला मनवणे सोपे गेले आणि माझा खरोखरच विश्वास आहे की तो या अलौकिक रोमान्समध्ये एक दुर्मिळ जिव्हाळा आणि विश्वासार्हता आणतो."

आयुष्मान खुरानाने आलोक गोयल या शहरातील पत्रकाराची भूमिका साकारली आहे, ज्याचे नेहमीचे जीवन तेव्हा बदलून जाते जेव्हा तो रश्मिका मंदानाने साकारलेल्या ताडका/तारिकाच्या प्रेमात पडतो. थामा हा मॅडॉक हॉरर कॉमेडी युनिव्हर्सचा 5 वा भाग आहे, जो स्त्री, रुही, भेडिया, मुंज्या आणि स्त्री 2 नंतर येतो. या चित्रपटाचे दिग्दर्शन मुंज्याचे दिग्दर्शक आदित्य सरपोतदार यांनी केले असून यात नवाजुद्दीन सिद्दीकी, परेश रावल आणि सत्यराज यांच्याही प्रमुख भूमिका आहेत.

शनिवार, 21 मार्च 2026 रोजी रात्री 8 वाजता फक्त सोनी मॅक्सवर थामाचा वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर पाहायला विसरू नका.

## मिशन लक्ष्यवेध अंतर्गत पुणे विभागीय क्रीडा निपुणता केंद्र सुरू

पुणे (दै. संध्या)

महाराष्ट्र शासनाच्या क्रीडा विभागाच्या मिशन लक्ष्यवेध या महत्त्वाकांक्षी उपक्रमांतर्गत पुणे विभागात विभागीय क्रीडा निपुणता केंद्र सुरू करण्यास मान्यता देण्यात आली आहे. या केंद्रामध्ये ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, हॉकी, रायफल शूटिंग, रोईंग, कुस्ती आणि टेबल टेनिस या आठ खेळांचा समावेश असून प्रत्येक खेळासाठी २० खेळाडूंची निवड करण्यात येणार आहे. या योजनेअंतर्गत खेळाडूंची निवड क्रीडा कामगिरी, कौशल्य आणि फिटनेस चाचणीच्या आधारे केली जाणार आहे. अर्ज करण्यासाठी इच्छुक खेळाडूंनी आपले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह दि. १७ मार्च २०२६ पर्यंत विभागीय उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, पुणे विभाग, विभागीय क्रीडा संकुल, येरवडा, पुणे येथे प्रत्यक्ष किंवा deputypune@gmail.com या ई-मेलवर पाठवावेत. अर्जदाराचे वय त्या वर्षाच्या ३१ डिसेंबरपर्यंत २५ वर्षांखालील असणे आवश्यक असून जन्मदाखला, अधिवास प्रमाणपत्र, आधार कार्ड, गत दोन वर्षांतील क्रीडा कामगिरीची प्रमाणपत्रे, शाळा/महाविद्यालयाचे बोनाफाईड प्रमाणपत्र, तीन पासपोर्ट आकाराचे फोटो, पालकांचे संमतीपत्र व शासन मान्यताप्राप्त डॉक्टरांचे वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

## टीपी-लिंक इंडियाच्या 'VIGI' कॅमेरा श्रेणीला मिळाले मानाचे 'BIS-ER' प्रमाणपत्र

मुंबई (दै. संध्या)

अमेरिकेतील 'टीपी-लिंक सिस्टम्स आयएनसी'ची उपकंपनी असलेल्या टीपी-लिंक इंडियाने आज त्यांच्या 'VIGI' सुरक्षा कॅमेरा श्रेणीसंदर्भात एक महत्त्वपूर्ण घोषणा केली आहे. कंपनीने माहिती दिली की, त्यांच्या VIGI C340 आणि VIGI C440 या दोन मुख्य मॉडेल्सनी भारत सरकारचे अनिवार्य 'BIS-ER' प्रमाणपत्र यशस्वीरित्या मिळवले आहे.

यामुळे, हे महत्त्वपूर्ण प्रमाणपत्र मिळवणाऱ्या भारतातील मोजक्या सुरक्षा कॅमेरा कंपन्यांच्या पंक्तीत आता टीपी-लिंक इंडियाचा समावेश झाला आहे. हे यश त्यांच्या उत्पादन प्रक्रियेत वापरले जाणारे अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि त्यांच्या प्रगत सुरक्षा वैशिष्ट्यांना अधोरेखित करते.

बीआयएस-ईआर (BIS-ER) हे एक अत्यंत काटेकोर आणि प्रक्रियेवर आधारित प्रमाणपत्र आहे, ज्यामध्ये केवळ उत्पादनाचीच नाही, तर संपूर्ण पुरवठा साखळी, सुटे भाग आणि सॉफ्टवेअरची मुळापासून कसून तपासणी केली जाते. 'VIGI' सुरक्षा कॅमेऱ्यांनी हा निकष पूर्ण केल्यामुळे, टीपी-लिंक इंडिया आता हे यश मिळवणाऱ्या निवडक कंपन्यांच्या यादीत सामील झाली आहे.

VIGI C340 आणि C440 या दोन्ही मॉडेल्समध्ये अनेक उच्च तंत्रज्ञानयुक्त वैशिष्ट्यांचा समावेश आहे. VIGI C340 हा बाह्य वातावरणामध्ये वापरासाठीचा फुल-कलर बुलेट नेटवर्क कॅमेरा असून, अगदी घनदाट अंधारातही स्पष्ट आणि रंगीत चित्रण करतो. हा कॅमेरा जास्तीत जास्त 4MP रिझोल्यूशन देतो; तसेच यातील 'लार्ज-अपर्चर लेन्स', 'हाय-सेन्सिटिव्हिटी सेन्सर' आणि जोडलेल्या पूरक प्रकाशामुळे (supplemental lights) अत्यंत दर्जेदार रंगीत मॉनिटरिंग मिळते.

VIGI C440 हा ४ मेगापिक्सेलचा फुल-कलर 'टरेट नेटवर्क कॅमेरा' आहे. यामध्ये हालचाली ओळखणे सोपे व्हावे यासाठी 'ह्युमन' आणि 'ट्रॅफिक' असे वर्गीकरण दिले आहे, तसेच संशयास्पद हालचालींची त्वरित दखल घेणारे 'स्मार्ट डिटेक्शन' तंत्रज्ञान आहे. यामध्ये 'टू-वे ऑडिओ' सुविधेमुळे तुम्ही कुठूनही व्हिडिओ पाहत असताना संवाद साधू शकता. तसेच, व्हिडिओ कॉम्प्रेशनसाठी यामध्ये उद्योग-मानक 'H.265+' तंत्रज्ञान वापरले आहे, ज्यामुळे स्टोअरेजची जागा कमी व्यापली जाते.

## पुणे जिल्ह्यातील जनगणनेसाठी कर्मचाऱ्यांनी तयार राहावे

**लोकांमध्ये जागृती करण्याचे निर्देश**

पुणे (दै. संध्या)

देशातील १६ वी जनगणना असलेल्या जनगणना २०२७ च्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील सर्व संबंधित विभागांनी आवश्यक तयारी पूर्ण करून जनजागृती आणि समन्वय साधावा, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी दिले.

१६ मे ते १५ जून या कालावधीत होणाऱ्या घरयादी व घरगणनेच्या कामकाजाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच पुणे जिल्ह्यातील दोन्ही महानगरपालिका आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

जनगणना ही संविधानिक व कायदेशीर प्रक्रिया असून ती संविधानातील अनुच्छेद २४६ (केंद्रसूची) आणि जनगणना अधिनियम १९४८ अंतर्गत राबविण्यात येते. जनगणना २०२७ ही १८७२ पासूनची देशातील १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना आहे. या प्रक्रियेत प्रगणक आणि पर्यवेक्षक हे महत्त्वाचे आधारस्तंभ असून त्यांच्या माध्यमातून घराघरांतून अचूक माहिती संकलित केली जाणार आहे. जनगणनेतून मिळणारी माहिती शासनाच्या नियोजन प्रक्रियेसाठी, विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी, संसाधनांचे योग्य वाटप तसेच मतदारसंघांचे परिसीमन यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यामुळे प्रत्येकाने जनगणना कार्यात सक्रिय सहभाग देऊन अचूक माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

जनगणना २०२७ ही दोन टप्प्यांत राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात घरयादी व घरगणना (२०२६) केली जाईल. या टप्प्यात घरांची स्थिती, उपलब्ध



सुविधा, मालमत्ता आदी बाबींची माहिती संकलित करून पुढील लोकसंख्या गणनेसाठी आधारभूत चौकट तयार केली जाईल. दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या गणना (२०२७) करण्यात येणार असून ठराविक संदर्भ दिनांक व वेळेनुसार प्रत्येक व्यक्तीची वैयक्तिक माहिती नोंदविण्यात येईल.

यावेळी जनगणना प्रक्रियेत मोठा तांत्रिक बदल करण्यात आला असून "सेन्सस २०२७–एचएलओ" या मोबाईल ॲपच्या माध्यमातून डिजिटल पद्धतीने माहिती संकलित केली जाणार आहे. तसेच प्रथमच स्व-गणना (सेल्फ एन्युमरेशन) ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी स्व-गणना करून माहिती सादर केल्यास ती अंतिम करण्यापूर्वी प्रगणकांकडून पडताळणी केली जाणार आहे.

जनगणना प्रक्रियेबाबत सर्व विभागांनी समन्वय ठेवून आवश्यक मनुष्यबळ, प्रशिक्षण आणि जनजागृतीसाठी नियोजन करावे, असे निर्देश निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी दिले.

## भगवान अग्रसेन चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे १५ मार्च रोजी भव्य सामूहिक विवाह सोहळा

पुणे (दै. संध्या)

सामाजिक बांधिलकी जपत गरीब व गरजू कुटुंबांना आधार देणाऱ्या भगवान अग्रसेन चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे दरवर्षी आयोजित करण्यात येणारा भव्य सामूहिक विवाह सोहळा यंदा रविवार, १५ मार्च २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे, या सोहळ्यासाठी २५ जोडप्यांची नोंदणी झाली आहे अशी माहिती फाउंडेशनचे विश्वस्त राजेश अग्रवाल यांनी दिली. या उपक्रमांबद्दल पुढे बोलताना राजेश अग्रवाल म्हणाले, आजच्या काळात वाढत चाललेल्या सामाजिक व आर्थिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर सामूहिक विवाह सोहळे ही काळाची गरज असून, अशा उपक्रमांतून खऱ्या अर्थाने मानवसेवा घडते, हा सोहळा ज्येष्ठ समाजसेवक रतनलाल गोयल यांच्या ७३व्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आला आहे. ते पुढे म्हणाले की, सध्या विवाह समारंभांवरील अवाजवी खर्चामुळे अनेक कुटुंबे आर्थिक अडचणीत सापडत आहेत. विशेषतः मुलीच्या विवाहाची चिंता पालकांसाठी मोठे ओझे ठरत आहे. अशा परिस्थितीत सामूहिक विवाह सोहळे समाजात एकात्मता, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीचा सकारात्मक संदेश देणारे ठरतात. या सोहळ्यात विवाहबंधनात अडकणाऱ्या प्रत्येक जोडप्याला कपाट, पंखा, गादी, चादर, मिक्सर, देव्हारा तसेच भांडी-कुंडी संच असे गृहउपयोगी साहित्य भेटस्वरूप देण्यात येणार आहे. यासोबतच वधू-वरांना संपूर्ण वस्त्रसंच, मंगलसूत्र व आवश्यक वैवाहिक साहित्य देखील प्रदान करण्यात येईल. हा धार्मिक विधी हिंदू संस्कृतीनुसार पार पडणारा विवाह सोहळा तीन एकर परिसरात पसरलेल्या भव्य अशा गोयल गार्डन, आईमाता मंदिरासमोर, गंगाधाम रोड, पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचे यंदा १३ वे वर्ष असून, मागील वर्षी २५ जोडप्यांचे विवाह यशस्वीरीत्या पार पडले होते. मागील १२ वर्षात २४१ जोडप्यांचे विवाह या सोहळ्यात लावण्यात आले आहेत.

# पाणीटंचाईविरोधात शिवसेनेचा पुणे महानगरपालिकेवर भव्य हंडा मोर्चा

**शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांच्या नेतृत्वात आंदोलन; महिलांनी माठ फोडून नोंदवला निषेध**

पुणे (दै. संध्या)

हडपसर परिसरातील पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांना नियमित व पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्यात यावा, या मागणीसाठी शिवसेना शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांच्या नेतृत्वात आज पुणे महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावर भव्य हंडा मोर्चा काढण्यात आला. या आंदोलनामध्ये शिवसेनेचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक तसेच मोठ्या संख्येने स्थानिक नागरिक सहभागी झाले होते. प्रशासनाच्या दुर्लक्षाविरोधात महिलांनी माठ फोडून तीव्र निषेध नोंदवला, तर घोषणांनी संपूर्ण परिसर दणाणून गेला.





उन्हाळ्याची सुरुवात होण्यापूर्वीच पुणे शहरातील अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची समस्या तीव्र होत असल्याचे चित्र दिसत आहे. विशेषतः हडपसर मतदारसंघातील प्रभाग क्रमांक ४१ तसेच परिसरात पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. नागरिकांच्या सोयीसाठी महानगरपालिकेने विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याच्या टाक्या उभारल्या असल्या तरी प्रत्यक्षात त्या टाक्यांमध्ये नियमित आणि पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा होत नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असून प्रशासनाने या प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

या समस्येबाबत शिवसेनेच्या वतीने सातत्याने पाठपुरावा करण्यात आला होता. मात्र प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही होत नसल्याचे पाहता या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी पुणे महानगरपालिकेच्या मुख्य प्रवेशद्वारावर हा हंडा मोर्चा आयोजित करण्यात आला. मोर्चादरम्यान शिवसैनिक आणि नागरिकांनी जोरदार घोषणा देत प्रशासनाविरोधात संताप व्यक्त केला. "टाक्या उभारल्या चौकात, पाणी नाही नळात", अशा घोषणांद्वारे महिलांनी प्रशासनाच्या कारभारावर तीव्र टीका केली. आंदोलनादरम्यान पाणीटंचाईची तीव्रता प्रशासनाला दाखवून देण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रवेशद्वारासमोर टँकर उभा करून पाण्याच्या टाक्या कशा रिकाम्या राहतात याचे प्रतीकात्मक चित्र सादर करण्यात आले. यावेळी महिलांनी माठ फोडून निषेध व्यक्त करत प्रशासनाच्या दुर्लक्षाचा तीव्र निषेध नोंदवला. आंदोलनामुळे काही काळ परिसरात मोठी गर्दी झाली होती आणि घोषणांनी महानगरपालिकेचा परिसर दणाणून गेला.

यावेळी बोलताना शहरप्रमुख प्रमोद नाना भानगिरे यांनी सांगितले की, हडपसर मतदारसंघातील प्रभाग क्रमांक ४१ मध्ये महानगरपालिकेने नऊ ते दहा मोठ्या पाण्याच्या टाक्या उभारल्या असून या टाक्यांमध्ये हजारो लिटर पाण्याची साठवणूक क्षमता आहे. मात्र प्रत्यक्षात या टाक्यांमध्ये अत्यंत अपुरा पाणीपुरवठा करण्यात येत आहे. काही भागांमध्ये अत्यंत कमी दाबाने पाणी येत असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. महानगरपालिकेच्या पाणीपुरवठा विभागाने तातडीने युद्धपातळीवर कामकाज करून पाणीपुरवठा सुरळीत करावा, अन्यथा येत्या पंधरा दिवसांत प्रश्न मार्गी न लागल्यास शिवसेना स्टाईलने तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी पुणे महानगरपालिका आयुक्त किशोर राम यांना निवेदन देण्यात आले. यावेळी शिवसेना शहर प्रमुख प्रमोद नाना भानगिरे, माजी जिल्हा परिषद सदस्य,स्वातीताई टकले, माजी सरपंच राकेश झांबरे, माजी सरपंच मच्छिंद्र दगडे, उपजिल्हाप्रमुख अमर घुले,सुभाष घुले, मिलिंद अहिरे, अभिमन्यू दादा भानगिरे, सचिन नाना तरवडे, प्रवीण हिलगे, पंकज कोंद्रे, अभिजीत बोराटे, दत्ता खवळे, शितल गाडे, आशाताई यादव, सुहास पडवळ, राहुल लबडे, आकाश रेणुसे, आकाश टकले, कविता पवार, मनोज जाधव, राणी पाटील, स्मिता साबळे, सचिन भानगिरे, प्रसाद सर, शिंदे मामा, दीपक मरळ, शंतनू सरकार, तुषार मरळ, आशा कांबळे यांच्यासह शिवसेनेचे सर्व प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### अक्कलकोट श्री स्वामी समर्थ पादुका पालखी सोहळ्याचे बारामतीत आगमन



बारामती (दैनिक संध्या) : श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ ट्रस्ट,अक्कलकोट यांच्यावतीने महाराष्ट्र पादुका परिक्रमा अंतर्गत महाराष्ट्रात अनेक गावांमध्ये श्री स्वामी समर्थांच्या पादुकांच्या पालखीचे आयोजन करण्यात येत असते.त्यानुसार बारामती येथे अक्कलकोट श्री स्वामी समर्थ पादुका पालखीचे आज सायंकाळी 5 वाजता शहरात आगमन व स्वागत होणार आहे.सद्‌गुरू श्री स्वामी समर्थ पादुका पालखी उत्सव समिती यांच्या वतीने अक्कलकोट श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पादुका पालखी उत्सवाचे आयोजन बुधवार दि. ११ मार्च २०२६ रोजी करण्यात आले आहे. सायंकाळी 5 वां. पालखीचे आगमन बारामती शहरात होणार आहे.पालखीचा मुक्काम चिराग गार्डन,रेल्वे स्टेशन समोर भिगवण रोड,बारामती येथे होणार आहे.सायंकाळी 7 ते 7.30 वाजता महाआरती व नामस्मरणाचा कार्यक्रम, महाआरती नंतर सर्व भाविक भक्तांना दर्शन व प्रसाद वाटपाचे आयोजन रात्री 11 वाजेपर्यंत करण्यात आले आहे. सायंकाळी ७ ते १० वाजेपर्जंत जय गिरिनारी दत्तपंथी सोंगी भजनी मंडळ,वलझलवाडी, ता.खंडाळा यांच्या वतीने सुश्राव्य भजनांचा कार्यक्रम होणार आहे.यावेळेस श्री स्वामी समर्थ भक्तांसाठी दुसऱ्या दिवशीही गुरुवार दि. १२ मार्च रोजी सकाळी ९ ते रात्री ११ वां.पर्यंत श्री स्वामी समर्थ पादुकांचे दर्शन व प्रसादाचा लाभ होणार आहे. दरवर्षी दर्शन व प्रसादासाठी एकच दिवस मिळत असल्याने लांबून येणाऱ्या स्वामी भक्तांना व नोकरदार वर्गाला दर्शनाचा लाभ घेण्यासाठी कसरत करावी लागत होती किंवा दर्शनाचे भाग्य मिळत नव्हते.मात्र आता सलग दोन दिवस श्री स्वामी समर्थ पादुकांच्या दर्शन लाभाची पर्वणी मिळाली आहे.श्री स्वामी समर्थ पादुकांचा सार्वजनिक महाअभिषेक व दर्शन सोहळा दि. १२ मार्च रोजी सकाळी ६ ते ७ होणार आहे. तसेच ज्या भाविकांना वैयक्तिक श्री स्वामी समर्थांच्या पादुकांना अभिषेक मध्ये सहभाग घ्यायचा असेल त्यांनी शुक्रवार दि. १३ मार्च रोजी श्री स्वामी समर्थ मठ, महावीर पथ,लिबर्टी टेलर्स, नंदिनी रेडिमेड समोर येथे सकाळी ६ ते ७ वाजेपर्यंत हजर रहावे.येताना अभिषेकासाठी दूध घेऊन यावे असे आवाहन आयोजक श्री स्वामी समर्थ पालखी उत्सव समिती, महावीर पथ,बारामती यांच्या वतीने श्री.राजाभाऊ काका थोरात यांनी केले आहे.सकाळी 11 वाजता श्री स्वामी समर्थ पादुका पालखी पुढील गावी रवाना होणार आहे.तरी सर्व बारामती मधील भक्तांनी श्री अक्कलकोट स्वामी समर्थ पादुका दर्शनाचा व प्रसादाचा लाभ घ्यावा असे आयोजकांकडून कळविण्यात आले आहे.

### गॅसचा अवैध वापर व साठेबाजी केल्यास थेट गुन्हे दाखल होणार – तहसीलदार

नाझरे सुपे (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यात घरगुती गॅस (एलपीजी) चा अवैध वापर व साठेबाजी रोखण्यासाठी प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. नागरिकांमध्ये इंधन व गॅस पुरवठा सुरळीत राहावा यासाठी प्रशासन सतर्क असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार विक्रम राजपूत यांनी दिली आहे इराण युद्धामुळे इंधन व गॅस पुरवठा सुरळीत राहणार की नाही याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. घरगुती गॅसचा काळाबाजार व अवैध वापर रोखण्यासाठी तालुका प्रशासनाने जिल्हाधिकारी पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली धडक मोहीम हाती घेतली आहे. गॅस एजन्सींना पारदर्शक वितरण ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून कोणत्याही प्रकारे गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घेण्यास सांगितले आहे. हॉटेल, ढाबे, उद्योग किंवा व्यावसायिक आस्थापनांनी घरगुती गॅसचा वापर करू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. तसेच नागरिकांना घाबरून गॅस साठवू नये, पुरेसा साठा उपलब्ध असून नियमित पुरवठा सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. काळाबाजार रोखण्यासाठी भरारी पथक स्थापन करण्यात आले असून हॉटेल व उद्योगांची तपासणीही केली जाणार आहे.



### हिरकणी मावळ नागरी पतसंस्थेला महाराष्ट्र नारी भूषण पुरस्कार 2026 ने सन्मानित

पुणे (दैनिक संध्या) : जागतिक महिला दिनानिमित्त महाराष्ट्र बुक ऑफ रेकॉर्ड, आझाद फाउंडेशन आणि टाइम्स ऑफ पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमात नारीशक्ती महाराष्ट्र नारी भूषण पुरस्कार 2026 देऊन हिरकणी मावळ महिला नागरी सहकारी पतसंस्था यांचा सन्मान करण्यात आला. हा पुरस्कार भूमाता ब्रिगेड च्या संस्थापिका तृप्तीताई देसाई, तसेच जयश्री सातव आणि ज्योती नाळे मॅडम (दैनिक संध्या संपादिका) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी संस्थेला सन्मानपत्र, मेडल आणि पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. या सन्मानाचा स्वीकार पतसंस्थेच्या अध्यक्षा सौ. मिनाक्षी ताई तिकोणे यांनी केला. तसेच पतसंस्थेचे पदाधिकारी उपाध्यक्षा उज्वलाताई दळवी सचिव मीनाक्षीताई भेगडे खजिनदार संगीता ताई नाईकरे संचालिका मानसी ताई गुप्ते राजश्री नाईकरे मंगल घोडके सुरेखा पलंगे कु विद्या तिकोणे कु वैष्णवी दळवी मुख्य लिपिक भक्ती मॅडम फडके उपस्थित होते. महिला सक्षमीकरण, आर्थिक स्वावलंबन आणि समाजकार्यातील उल्लेखनीय कार्याबद्दल हिरकणी मावळ महिला नागरी सहकारी पतसंस्थेचा गौरव करण्यात आला. या पुरस्कारामुळे संस्थेच्या कार्याची दखल घेतली गेली असून, भविष्यातही महिला सबलीकरणासाठी कार्य करण्याची प्रेरणा मिळाल्याची भावना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली.

### नारायणगावच्या सुपुत्राची राष्ट्रीय कार्यकारिणीवर नियुक्ती



नारायणगाव (दैनिक संध्या) : प्रसिद्ध उद्योजक, आध्यात्मिक मार्गदर्शक आणि निस्वार्थ समाजसेवक म्हणून ओळखले जाणारे जुन्नर तालुक्यातील नारायणगावचे सुपुत्र विशाल भुजबळ यांची 'विश्व हिंदू महासंघ' (World Hindu Federation – भारतीय शाखा) च्या राष्ट्रीय कार्यकारिणीचे सदस्य म्हणून अधिकृतपणे नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या या नियुक्तीमुळे महाराष्ट्रातील एका तळागाळातून काम करणाऱ्या नेतृत्वाला आता राष्ट्रीय पातळीवर मोठी ओळख मिळाली आहे. विशाल भुजबळ हे 'त्रिशक्ती उद्योग समूहा'चे संस्थापक आणि अध्यक्ष आहेत.व्यावसायिक क्षेत्रात त्यांनी स्वकर्तृत्वावर मोठे यश संपादन केले आहे, परंतु त्यांची खरी ओळख त्यांच्या सामाजिक कार्यातून निर्माण झाली आहे. समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी ओळखून त्यांनी अनेक गरजू आणि उपेक्षित घटकांसाठी आपले आयुष्य वेचले आहे. सर्वाधिक लक्षवेधी आणि माणुसकीला साजेसे त्यांचे कार्य म्हणजे त्यांनी आजवर तब्बल एक हजाराहून अधिक बेवारस मृतदेहांवर स्वखर्चाने आणि पूर्ण सन्मानाने अंत्यसंस्कार केले आहेत. ज्यांना जगात कुणीही वाली नाही, अशांसाठी ते धावून जातात.

# वन्यजीव निसर्ग संवर्धन रेस्क्यू टीम संस्थेचा वर्धापन दिन साजरा

नारायणगाव (दै. संध्या)



निसर्ग, पर्यावरण आणि वन्यजीव संरक्षणाच्या पवित्र उद्दिष्टाने कार्यरत असलेल्या वन्यजीव निसर्ग संवर्धन रेस्क्यू टीम संस्था, जुन्नर यांच्या प्रथम वर्धापन दिनानिमित्त आयोजित विशेष कार्यक्रम मोठ्या उत्साहात व दिमाखात पार पडला. या कार्यक्रमाला पुणे जिल्ह्यातील विविध भागांतून वन्यजीव संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या संस्था, सर्पमित्र, सामाजिक कार्यकर्ते व मान्यवरांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली. कार्यक्रमाच्या मुख्य उपस्थितीमध्ये सर्पदंश तज्ञ डॉ. सदानंद राऊत, माजी सैनिक रमेश खरमाळे, सामाजिक कार्यकर्त्या मनीषा शेख, वर्ड फोर नेचर संस्थेचे संस्थापक अध्यक्ष शुभम पांडे, तसेच जुन्नर वनविभागाचे वनपाल गणेश बागडे, वनपाल अनिल सोनवणे, वनरक्षक विशाल गुंड आणि वनरक्षक कैलास भालेराव हे मान्यवर उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी वन्यजीव संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या स्वयंसेवकांचे कौतुक करत अशा संस्थांचे कार्य समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी वन्यजीव निसर्ग संवर्धन रेस्क्यू टीम संस्था, जुन्नर चे अध्यक्ष आकाश माळी, उपाध्यक्ष दीपक माळी, सचिव हेमंत गाडगे, खजिनदार सतीश घाडगे, उपकार्याध्यक्ष सुरेश गायकवाड, सल्लागार आदित्य हांडे, ऋषी वावळ आणि प्रज्ञेश काशीकेदार यांसह सर्व पदाधिकारी व सदस्यांनी मोलाचे योगदान दिले. सर्वांच्या संयुक्त प्रयत्नातून कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध आणि यशस्वीरीत्या पार पडला. कार्यक्रमादरम्यान वन्यजीव संरक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या विविध संस्था व कार्यकर्त्यांना "वन्यजीव निसर्ग रक्षक पुरस्कार" प्रदान करून त्यांचा सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. या सन्मानामुळे वन्यजीव संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना नवीन प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुनील डोंगरे यांनी करत संस्थेच्या कार्याची माहिती उपस्थितांसमोर मांडली. त्यांनी संस्थेने गेल्या वर्षभरात केलेल्या वन्यजीव रेस्क्यू, जनजागृती आणि पर्यावरण संवर्धनाच्या विविध उपक्रमांचा आढावा घेतला. या कार्यक्रमामुळे जुन्नर परिसरात वन्यजीव संरक्षणाबाबत जागरूकता निर्माण होण्यास मोठी मदत झाली असून भविष्यातही संस्था अशाच प्रकारे समाजासाठी आणि वन्यजीवांच्या संरक्षणासाठी कार्यरत राहणार असल्याचा विश्वास पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

## 'क्रिसेंट म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युटर्स'तर्फे २१ मार्चला एकल पालक संमेलन

पुणे (दै. संध्या)



■ एकल पालक दिनानिमित्त निवृत्त न्यायाधीश मृदुला भाटकर, सामाजिक कार्यकर्ते यजुर्वेंद्र महाजन यांचे मार्गदर्शन; भूषण वाणी यांची माहिती

पालकत्वाच्या जबाबदारीचे आव्हान पेलणाऱ्या एकट्या आई किंवा वडिलांना अनेक गोष्टींचा सामना करावा लागतो. संघर्षाच्या या प्रवासात अनेकांना आपलेपणाची साथ हवी असते. सकारात्मक अनुभव, प्रेरणा आणि आप्तेष्टांच्या साथीने एकल पालकत्व अधिक सुकर होण्यासाठी 'एकल पालक दिन' साजरा करण्यात येत आहे. यानिमित्ताने येत्या २१ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ४.३० वाजता दादासाहेब दरोडे सभागृह, बीएमसीसी रस्ता, पुणे येथे एकल पालक संमेलनाचे आयोजन केले आहे, अशी माहिती क्रिसेंट म्युच्युअल फंड डिस्ट्रिब्युटर्सचे संचालक भूषण वाणी यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी कौटूंबिक न्यायालयातील ज्येष्ठ समुपदेशिका डॉ. स्मिता प्रकाश जोशी उपस्थित होत्या. एकल पालक संमेलनाचे हे तिसरे वर्ष आहे. एकट्याने पालकत्वाची जबाबदारी सांभाळत असलेल्या पालकांना एकत्रित करून त्यांचा हुरूप वाढवण्याचा प्रयत्न यातून होतो. तसेच त्यांना संघर्षाच्या वाटेवर आनंदाचा क्षण साजरा करण्याची संधी मिळते. 'एकल पालक' या विषयावर तज्ज्ञांचे मार्गदर्शन, मनोरंजनाचे कार्यक्रम, तसेच आर्थिक नियोजन याबाबत सखोल मार्गदर्शन केले जाते.

## 'स्कूल ऑफ कलायोगा'ची सुरुवात; चिन्मय विश्वविद्यापीठाचा नवा उपक्रम

पुणे (दै. संध्या)




सांस्कृतिक परंपरेसाठी ओळखल्या जाणाऱ्या पुण्यात बाणेर येथे चिन्मय विश्वविद्यापीठाच्या 'स्कूल ऑफ कलायोगा' या नव्या संगीत शिक्षण संस्थेचे उद्घाटन करण्यात आले. या संस्थेचे उद्घाटन चिन्मय मिशनचे प्रमुख आणि चिन्मय विश्वविद्यापीठाचे कुलगुरू स्वामी स्वरूपानंद यांच्या हस्ते झाले. चिन्मय विश्वविद्यापीठ ही अशी संस्था आहे जिथे प्राचीन गुरु–शिष्य परंपरेचा वारसा आणि आधुनिक विद्यापीठीय शिक्षणपद्धती यांचा संगम साधला जातो. बाणेर येथे सुरू झालेल्या या 'स्कूल ऑफ कलायोगा'मुळे विद्यार्थ्यांना भारतीय शास्त्रीय संगीताचे गुरुकुल पद्धतीने शिक्षण घेताना विद्यापीठ मान्यताप्राप्त पदवी मिळवण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

या प्रसंगी बोलताना पुण्यातील 'चिन्मय नाद बिंदू'च्या संचालिका आणि 'स्कूल ऑफ कलायोगा'च्या प्रमुख प्रमोदिनी राव यांनी सांगितले की, भारताची प्राचीन ज्ञानपरंपरा आणि तत्त्वज्ञान जगभर प्रसिद्ध आहे. संगीत शिक्षण केवळ कौशल्य विकसित करण्यापुरते मर्यादित न राहता कलाकार, कला आणि रसिक यांना उंच आध्यात्मिक व सांस्कृतिक स्तरावर नेणारे असले पाहिजे.

या संस्थेमध्ये चार वर्षांचा पदवी अभ्यासक्रम – बीए ऑनर्स इन म्युझिक, दोन वर्षांचा पदव्युत्तर अभ्यासक्रम – एमए इन म्युझिक, तसेच संगीत विषयातील पीएचडी अभ्यासक्रम उपलब्ध असतील.

पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमांमध्ये हिंदुस्थानी गायन, बासरी आणि तबला या विषयांमध्ये विशेष अभ्यासाची संधी मिळणार आहे. तर पीएचडी कार्यक्रमांत सादरीकरण, अध्यापन पद्धती, संगीतशास्त्र आणि भारतीय ज्ञानपरंपरा या विषयांवर सखोल संशोधनाला प्राधान्य दिले जाणार आहे. या संस्थेचे वैशिष्ट्य म्हणजे दोन स्तरांवरील अध्यापन पद्धती. पारंपरिक पद्धतीने गुरुंकडून अनुभवाधारित मार्गदर्शन मिळणार असून सहाय्यक प्राध्यापकांकडून सैद्धांतिक आणि संशोधनाधारित शिक्षण दिले जाईल. त्यामुळे विद्यार्थ्यांचा संगीतज्ञान, रियाज, सैद्धांतिक समज आणि संशोधन क्षमता यांचा सर्वांगीण विकास साधला जाईल.

'स्कूल ऑफ कलायोगा'मध्ये संगीताला केवळ अभ्यासाचा विषय न मानता साधना आणि जीवनपद्धती म्हणून जोपासले जाणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना मैफिली, बैठका, संगीत महोत्सव आणि विद्वान कलाकारांशी संवाद अशा विविध सांस्कृतिक उपक्रमांत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

# ४० वे कवी संमेलन व कला-साहित्य पुरस्कार सोहळा

पुणे (दै. संध्या)



महाराष्ट्राचे शिल्पकार आणि पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त स्वर्गीय प्रकाश ढेरे चॅरिटेबल ट्रस्ट व गंगा लॉज मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने ४० वे कवी संमेलन आणि यशवंतराव चव्हाण कला-साहित्य पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. हा सोहळा गुरुवार (१२ मार्च) रोजी रात्री ८.३० वाजता टिळक स्मारक मंदिर, पुणे येथे होणार आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांच्या हस्ते तसेच ज्येष्ठ नाट्यअभिनेते सतीश आळेकर आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे पुणे शहराध्यक्ष सुनील टिंगरे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कारांचे वितरण होणार असल्याची माहिती संयोजक संजय ढेरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी ट्रस्टचे गौरव फुटाणे, कुणाल जाधव, कवी भरत दौंडकर, कवयित्री अंजली कुलकर्णी, सुनील महाजन आदी उपस्थित होते.

संजय ढेरे म्हणाले की, गेल्या ४० वर्षांपासून दरवर्षी १२ मार्च रोजी या सोहळ्याचे आयोजन केले जाते. यंदा 'यशवंतराव चव्हाण कला जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ अभिनेते महेश कोठारे यांना जाहीर झाला आहे. तसेच दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रथमच दिला जाणारा 'अजितदादा सामाजिक कार्य पुरस्कार' सावंतवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते रानमाणूस प्रसाद गावडे यांना जाहीर करण्यात आला आहे. या पुरस्कारांचे स्वरूप प्रत्येकी ५० हजार रुपये रोख व सन्मानचिन्ह असे आहे.

## जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समिती सदैव शेतकऱ्यांच्या पाठीशी - संजय काळे

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर कृषी उत्पन्न बाजार समितीच्या नारायणगाव येथील टोमॅटो मार्केटच्या आवारातील कृषी मेळाव्यात टोमॅटो पिकाच्या लागवड व व्यवस्थापनाबाबत शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. बदलत्या हवामानाच्या पार्श्वभूमीवर टोमॅटो लागवड करताना योग्य वाणांची निवड, खत व्यवस्थापन आणि कीड-रोग नियंत्रण यावर विशेष भर देण्यात आला. बाजार समितीचे सभापती संजय काळे, उपसभापती निवृत्ती काळे, टोमॅटो लागवड व व्यवस्थापन विषयाचे मार्गदर्शक सुशील धुमाळ, राष्ट्रीय सुगी पाश्चात्त्य तंत्रज्ञान संस्था सहाय्यक व्यवस्थापक अमोल भोंग,संचालक माऊली खंडागळे, सारंग घोलप,नबाजी घाडगे, पांडू गाडगे, नाना घोडे, जनार्धन मरबळ, आरती वारुळे, प्रियंका शेळके, प्रकाश ताजने, सचिव रुपेश कवडे, सहसचिव शरद घोंगडे, शेतकरी संघटनेचे सचिन थोरवे प्रमोद खांडगे तसेच शेतकरी व व्यापारी अधिक संख्येने उपस्थित होते.

## शिवजन्मभूमीतील सुपुत्राची कौतुकास्पद कामगिरी!

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्यातील आळेफाटा येथील युवक कु.श्रद्धेय सुनिल गाडेकर याने प्रमोद पुडाळे आणि सागर यादव या आपल्या दोन इंजिनिअर मित्रांच्या मदतीने 'दुर्ग' हे भारतातील पहिले ऑफलाइन नेव्हिगेशन ट्रेकिंग अॅप तयार केले आहे. हे अॅप गड-किल्ले चढताना मार्ग अचूक दाखवते. सध्या सह्याद्रीत ट्रेकिंग करताना अपघातांची संख्या वाढली आहे. नुकत्याच आपल्या पुणे ग्रामीण जिल्ह्यात अशा घटना घडल्या आहेत. हरवणे, वाट चुकणे असे प्रसंग घडतानाच्या बातम्या ऐकायला मिळतात. हे टाळण्यासाठी हे अॅप ट्रेकर्ससाठी मार्गदर्शक ठरणार आहे. भारतातील पहिल्या आणि एकमेव ऑफलाइन ट्रेकिंग नेव्हिगेशन या अॅपमध्ये २००+ गड-किल्ले, धबधबे आणि गुहांचे नकाशे उपलब्ध आहेत. इंटरनेटशिवायही हे अॅप आपल्याला अचूक मार्गदर्शन करून आपले ट्रेकिंग सुरक्षित आणि सोपे करते. बीएससी अॅग्री असलेले कु.सुनिल गाडेकर हे सध्या M.B.A. करत असून, लहानपणापासून गड-किल्ले सर करण्याची आणि ट्रेकिंगची त्यांना आवड होती. ट्रेकिंगदरम्यानच्या समस्या पाहून त्यांनी हे अॅप बनवण्याचा निर्धार केला आणि बारावीनंतर याकामी त्यांचे प्रयत्न सुरू झाले.

## पुणे महापौर चषक राज्यस्तरीय अश्वारोहण स्पर्धा आजपासून (दि.१२)

*स्टेट इक्वेस्ट्रीयन असोसिएशनचा सहभाग ; ड्रसाज, शो जम्पिंग, टेंट पेगिंग प्रकारात स्पर्धा*

पुणे (दै. संध्या)




ऑलिम्पिकमधील खेळाचा वेगळा प्रकार असलेल्या अश्वारोहण स्पर्धेचा थरार आजपासून (दि.१२ मार्च ) पुणेकरांना अनुभवता येणार आहे. पुणे महापौर चषक राज्यस्तरीय अश्वारोहण स्पर्धेत स्टेट इक्वेस्ट्रीयन असोसिएशनचा सहभाग असून दि. १२ ते १५ मार्च दरम्यान स.प. महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर ही स्पर्धा होणार आहे. यामध्ये राज्यातील ८ जिल्ह्यातील १७५ हून अधिक स्पर्धक सहभागी होतील, अशी माहिती असोसिएशनचे अध्यक्ष गुणेश पुरंदरे यांनी दिली. पुण्याच्या महापौर मंजुषा नागपुरे, उपमहापौर परशुराम वाडेकर, आयुक्त नवल किशोर राम, नगरसेवक धीरज घाटे, राघवेंद्र उर्फ बापू मानकर, स्वरदा बापट, कुणाल टिळक, स्वप्नाली पंडित यांसह असोसिएशनचे अध्यक्ष गुणेश पुरंदरे, सचिव नरेंद्र पाटील, खजिनदार विनायक हळबे तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांचा स्पर्धेच्या नियोजनात सहभाग आहे. ड्रसाज, शो जम्पिंग, टेंट पेगिंग यांसह जिमखाना प्रकारात ही स्पर्धा होईल. वयवर्षे १० ते १२, १२ ते १४, १४ ते १६, १६ ते १८ आणि १८ च्या पुढे खुला गट अशा पाच वयोगटात स्पर्धा होणार आहे. पुण्यासह मुंबई, अहिल्यानगर, नाशिक, नंदुरबार, सोलापूर अशा विविध ठिकाणांहून स्पर्धक सहभागी होत आहे. विजेत्यांना एकूण २ लाख ४० हजार रुपयांची पारितोषिके देण्यात येतील. रविवार, दि. १५ मार्च रोजी सायंकाळी स्पर्धेचा पारितोषिक वितरण कार्यक्रम होणार आहे. दि. १२ ते १५ मार्च दरम्यान दररोज सकाळी ८ ते ११ आणि सायंकाळी ५ ते ७ यावेळेत पुणेकरांना अश्वारोहणाचा हा थरार अनुभवता येणार आहे.

# बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलची शहर कार्यकारिणी जाहीर

बारामती (दै. संध्या)



बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) सेवादलची शहर कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून अॅड.धीरज माणिक लालबीगे यांची शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या शहर कार्यालयात आयोजित बैठकीत ही कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजितदादा पवार, राज्यसभा खासदार पार्थ पवार तसेच युवा नेते जय पवार यांच्या सूचनेनुसार बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अॅड.किरण इंगळे यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.या बैठकीत बारामती शहर राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलच्या संघटनात्मक बांधणीसाठी नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली. यावेळी शहराध्यक्ष अॅड. धीरज लालबीगे यांनी सेवादलच्या शहर कार्यकारिणीची घोषणा केली. पक्षाची संघटना अधिक मजबूत करण्यासाठी तसेच सामाजिक व जनहिताच्या उपक्रमांमध्ये सेवादलने सक्रिय भूमिका बजावावी, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. या बैठकीस शहराध्यक्ष अॅड. किरण इंगळे, उपनगराध्यक्षा श्वेता नाळे, नगरसेवक सोमनाथ गजाकस,गणेश जोजारे, विशाल हिंगणे,गोरख पारसे,सेवादलचे प्रदेश उपाध्यक्ष सुनील काळे, सेवादल जिल्हाध्यक्ष सचिन गुप्ता,जिल्हा महिला कार्याध्यक्ष ज्योती गाडे, बारामती शहर सेवादलच्या महिला अध्यक्षा अनिता जाधव तसेच राष्ट्रवादी शहर कार्यालयातील जनसंपर्क अधिकारी (पीआरओ) सूरज देवकाते आदी मान्यवर उपस्थित होते.

अशी आहे शहर सेवादल कार्यकारिणी : शहराध्यक्ष – अॅड. धीरज माणिक लालबीगे, उपाध्यक्ष – शरद धूमाळ, मोहन रणदिवे,शहर संघटक – सचिन भोसले, अॅड.रोहन कांबळे,गरीब नवाज शेख,वैभव व्हटकर,

कार्यकारिणी सदस्य : सचिन थोरात,शिवकांत गाडे,अॅड.धीरज गावडे, अॅड.ओमकार क्षीरसागर, हुसेन शेख,शिवाजी भिसे, ओम पाटोळे,अमोल गांधी, संतोष सावंत नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून बारामती शहरात राष्ट्रवादी काँग्रेस सेवादलचे संघटन अधिक बळकट करून विविध सामाजिक उपक्रम राबवले जातील, असा विश्वास यावेळी पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.